**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक

# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १०० | शुक्रवार, दि. ३० मे २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सितारान थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334

## संमिश्र

### अधिकाऱ्याला लाच घेताना पकडले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** सीबीआयने थेट मुंबई येथील पासपोर्ट कार्यालयात एका अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहात अटक केली आहे. पासपोर्ट कार्यालयातील सहाय्यक आणि एका दलालाला भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत अटक करण्यात आली आहे. बनावट पासपोर्ट बनवल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. कनिष्ठ पारपत्र सहाय्यक अक्षय कुमार मीणा व दलाल भावेश शांतीलाल शहा अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

### दहशतवाद-संवाद एकत्र चालू शकत नाही

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली :** भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी गुरुवारी भारत-पाक तणाव, अमेरिकेचे शुल्क आणि व्हिसा आणि बांगलादेश यासह अनेक मुद्द्यांवर पत्रकार परिषद घेतली. पाकिस्तानबाबत ते म्हणाले की, आमचा दृष्टिकोन स्पष्ट आहे की दहशतवाद आणि चर्चा एकत्र होऊ शकत नाहीत. काही वर्षांपूर्वी भारताने पाकिस्तानला दहशतवाद्यांची यादी सोपवली होती. त्या सर्व दहशतवाद्यांना आमच्या स्वाधीन करा. त्यांनी पीओकेवर बेकायदेशीरपणे कब्जा केला आहे. आम्ही त्यावरून पाकचा ताबा काढून टाकण्याबद्दल बोलू.

### आता शिंतोडे तरी उडवू नका?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** माझ्या मुलीवर आरोप करणाऱ्या वकिलांना देखील मुली-बाळी असतील. आता माझे लेकरु तर गेले आहेच. मात्र, तीच्यावर एवढे वाईट शिंतोडे उडवू नका, अशा शब्दात वैष्णवी हगवणेचे वडिल अनिल कस्पटे यांनी हात जोडून विनंती केली आहे. माझ्या लेकराची अशी बदनामी करु नका, असे म्हणत असताना त्यांना अश्रू अनावर झाले.

### आमदारांच्या घरात घुसण्याचा प्रयत्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** खडकवासला मतदारसंघाचे भाजप आमदार भीमराव तापकीर यांच्या घरात घुसण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी शंकर सर्जेराव धुमाळ (वय ४७, रा. पुणे) याला पोलिसांनी अटक केली आहे.




# सीईओ साहेब, चौकडीपासून सावध रहा

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर : मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यापासून आनंद भंडारी यांच्या स्वागतासाठी आता अनेकजण पुष्पगुच्छ घेऊन येत असून सत्कार करीत आहेत. काहीजण आपण काय करू शकतो, काय कामे केली हे याच वेळी पटवून देत आहे. अशा पुढेपुढे करणाऱ्या लोकांपासून सीईओ साहेब सावध रहा, अशी म्हणण्याची वेळ कर्मचाऱ्यांवर आलेली आहे. या चौकडीने या मागे वरिष्ठांच्या पुढे पुढे करून स्वतःचा स्वार्थ साधला असून नियुक्तीपासून आजपर्यंत ही मंडळी आता येथेच कार्यरत आहे.**



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांची बदली होऊन त्यांच्या जागी आता आनंद भंडारी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून हजर झालेले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या कार्यकाळात काही कर्मचाऱ्यांवर अन्याय झालेला आहे. याच कार्यकाळात काहींनी बनावट प्रमाणपत्र देऊन बदल्याही करून घेतलेल्या आहेत. याच कार्यकाळात काहींनी राजकीय हस्तक्षेपाचा वापर करून आपल्या बदल्या करून घेतलेल्या आहेत.

या सर्वच प्रकरणाची जिल्हा परिषदेत चर्चा सुरु असली तरी वरिष्ठ मेहेरबान असल्यामुळे त्यावर कारवाई झालेली नाही. आगामी काळातही असेच प्रकार होण्याची शक्यता आहे.

भंडारी साहेब, आपले अहिल्यानगर जिल्ह्यात स्वागत आहे. जिल्हा राज्यात सर्वाधिक मोठा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात काम करताना अधिकाऱ्यांना समन्वय साधूनच कामकाज करावे लागते.

समन्वय साधताना कार्यालयातील चौकडी बाजुला ठेवून कामकाज करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आपण मूळचे पुणे जिल्ह्यातील आहात. त्यामुळे आपल्याला जिल्ह्याची भौगोलिक व राजकीय स्थिती चांगली माहिती असणार आहे. मात्र कर्मचाऱ्यांच्या बाबतीत माहिती कमी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुरूवातीच्या काळात आपण सर्वच विभागांचा आढावा घ्यावा. त्यानंतर कामकाजाला सुरूवात करावी, अशी अपेक्षा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून वरिष्ठांच्या भोवती फिरणारी ती चौकड आपल्याजवळ येऊ शकते. ते नेहमी सहकारी व इतर कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांना चुकीची माहिती देऊन आपला स्वार्थ साधू शकतात. अशी कामे अर्थमधून सर्वाधिक होत आहे.

ही अर्थहीन माणसे अधिकाऱ्यांचा पगार व इतर कामे करून आपली दैनंदिन कामातून सुटका करून घेत आहेत. अधिकाऱ्यांची कामे करताना अर्थहीन माणसे नेहमीच सर्वसामान्य कर्मचाऱ्यांना त्रास देत आहेत. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांपासून सावध राहून कारभार करावा, अशी अपेक्षा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

**आरोग्यातील बदल्यांमध्ये दुरुस्तीची गरज**

जिल्हा परिषदेतील बदल्यांच्या प्रक्रियेत आरोग्य विभागाच्या बदल्यांची प्रक्रिया चांगलीच चर्चेत आलेली आहे. ही बदल्यांची प्रक्रियेत गोंधळ झालेला आहे. त्यावर आपण लक्ष घालून चुकीच्या पध्दतीने झालेल्या कामकाजात दुरुस्ती करावी, सर्वांना अपेक्षित आहेत.

**स्थानांतरमधील किती जण त्याच जागेवर, शोध घ्या**

जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांचे स्थानांतरण करण्यात आलेले आहे. परंतु स्थानानंतरणाची प्रक्रिया होऊन तीन महिने लोटले आहेत. परंतु काहीजण त्याच जागेवर आहेत. त्या कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यासह त्या विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**गोपनियतेचा होतोय भंग**

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी कामकाजाबाबत नेहमीच गोपनियता ठेवणे गरजेचे आहे. परंतु जिल्हा परिषदेतील काही कर्मचारी नेहमीच गोपनियतेचा भंग करीत आहेत. या अगोदरही असे प्रकार जिल्हा परिषदेत झालेले आहेत. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांचा सीईओसाहेब आपण शोध घेऊन गोपनियतेचा भंग करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांमधून होत आहे.

**प्रशासकीय बदली होऊन 'ते' तेथेच**

जिल्हा परिषद प्रशासनाने प्रशासकीय बदलीची प्रकिया राबविलेली आहे. परंतु, त्यातील काही कर्मचारी मूळ ठिकाण सोडून नवीन नियुक्तीच्या ठिकाणी जात नाही. त्याच जागेवर राहण्यासाठी काहींचे प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळे 'त्या' जागेवर काही तरी गोलमाल होत असल्याची शक्यता आहे. त्यामुळे बदली झालेल्यांना त्या ठिकाणी जाण्यासाठी प्रत्येक खाते प्रमुखांना आदेश द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करीत आहेत.

**'त्या' कर्मचाऱ्याची चौकशी करालाच**

प्रकरणात एखाद्यावर कारवाई झाल्यानंतर त्याच्याकडे आर्थिक व्यवहार देऊन नये, असा नियम आहे. परंतु, या नियमाला डावलण्यात आलेले आहे. असे कर्मचारी जिल्हा परिषदेत कार्यरत आहे. त्यावरही आपला कटाक्ष टाकावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शेजाऱ्यांच्या प्रेमात पडू नका : डॉ. विखे

## राहात्यातील कोऱ्हाळे, डोऱ्हाळे, वाळकी येथील तलावांचे जलपूजन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** निळवंडेचे पाणी येणार नाही, अशी टीका करणाऱ्यांना प्रत्यक्ष पाणी पाझर तलावामध्ये आणून उत्तर दिले आहे. जोपर्यंत निळवंडेचे पाणी येत नाही, तोपर्यंत सत्कार घेणार नाही. हा आपला संकल्प होता आणि तो आता पूर्ण झाला आहे. या भागाचे वातावरण पाहून काही जण इकडे आले. परंतु, त्यांचा उपयोग झाला नाही. येथील जनतेने विकासला आणि पाणी देणाऱ्या नेतृत्वाला अर्थात मंत्री विखे पाटील यांना आठव्यांदा मतदान करून दिले आहे. पाणी आल्याने जिरायत भाग समृध्द झाला आहे. ज्यांनी विखेंना विरोध केला, त्यांना त्यांची चुक समजली आहे. त्यामुळे तेही आपल्यासोबत येत आहे. आपण जे पान ४

**डॉ. सुजय विखे पाटील यांचे उत्स्फुर्त स्वागत**

निळवंडे पाणी प्रश्न सोडावा, यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत गेलो. आज जलसंपदा खाते हे काय करू शकते. हे मंत्री विखे पाटील प्रत्यक्ष कामातून विरोधकांना उत्तर दिले आहे. या परिसरातील विखे पाटलांच्या अनेक विरोधकांनी डॉ. सुजय विखे पाटील यांचा पाणी उपलब्ध करून दिल्याबद्दल सत्कार करत आम्ही आपल्यासोबत आहोत, अशी ग्वाही या निमित्ताने दिली. गावोगावी नागरिकांनी डॉ. सुजय विखे पाटील यांचे उत्स्फुर्त स्वागत केले.

# चौंडी पर्यटन क्षेत्र होणार : ना. शिंदे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३१ मे रोजीच्या जन्म त्रिशताब्दी निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबवित आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा न्यायप्रिय राज्यकारभार, प्रजाहितदक्षता, आक्रमकांनी उध्वस्त केलेल्या मंदिरांचे त्यांनी केलेले पुन:निर्माण आणि १८ व्या शतकातील त्यांचे सांस्कृतिक पुनरुत्थानाचे कार्य आपल्याला चिरस्फुर्तीदायी आहे.



चौंडी येथील विकास आराखड्यासाठी ६८१ कोटींच्या खर्चास वित्तमंत्री अजित पवार यांच्या नियोजन विभागाने प्रशासकीय मान्यता दिल्याने येत्या तीन वर्षात कामे पूर्ण होऊन श्रीक्षेत्र चौंडी एक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन आणि तीर्थक्षेत्र म्हणून नावरुपास येईल, असा विश्वास विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केला.

सभापती शिंदे यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्र सरकारची मंत्रीपरिषद बैठक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून ६ मे, २०२५ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जन्मगावी म्हणजे श्रीक्षेत्र चौंडी येथे पार पडली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रीमंडळाने घेतलेले श्रीक्षेत्र चौंडी येथील स्मृतीस्थळ विकास आराखडा संदर्भातील महत्वपूर्ण निर्णय दि. ६ मे रोजी घोषित केले. राज्य मंत्रीमंडळाने या बैठकीत राज्यातील मंदिरांचा जीर्णोध्दार करण्यासाठी ५५०० कोटी रुपयांच्या निधीची घोषणा केली.

वित्तमंत्री पवार यांनी चौंडी येथील विकास आराखड्यासाठी ६८१ कोटींच्या खर्चास नियोजन विभागाने प्रशासकीय पान ४

# मराठवाडा दुष्काळमुक्त करणार

## मुख्यमंत्री फडणवीस यांचे आश्वासन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**हिंगोली :** नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून गोदावरीच्या खोऱ्यात आणून मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी ता. २९ हिंगोली येथे दिले.

हिंगोली जिल्ह्यातील विविध विकास कामांचे भुमीपूजन व लोकर्पण सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष आमदार हेमंत पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष गजानन घुगे, आमदार तान्हाजी मुटकुळे, माजी आमदार राम राव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, फुलाजी शिंदे, कैलास काबरा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचे आमचे प्रयत्न आहेत. त्यासाठी नदी जोड प्रकल्प हाती घेऊन समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात आणले जाईल. तसेच फ्लड डायव्हर्जन प्रकल्प राबविला जाणार असून पुराचे पाणी मराठवाड्यात आणले जाईल. याकामाच्या पुढील म हिन्यात निवीदा काढल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतरत्न नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या दुसऱ्या टप्यात राज्यातील ७५०० गावांसाठी पाच हजार कोटी रुपयांची गुंतवणुक करण्याचा निर्णय घेतला आहे. एवढेच नव्हे तर शेती क्षेत्रात शासनाकडून दरवर्षी पाच हजार कोटी रुपयांची गुंतवणुक करण्याचे शासनाने ठरविले आहे. पान ४

# ..अन्यथा ठेकेदार-अधिकाऱ्यांवर कारवाई करणार

## आ. आशुतोष काळे; कोपरगाव-सावळीविहीर रस्त्याच्या कामाला गती द्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहराच्या जवळून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ७५२ जी या महामार्गाचे काम रखडले आहे. शिवाय सबंधित ठेकेदार कोणत्याही प्रकारचे नियोजन करता अत्यंत धिम्या गतीने काम करीत आहे. त्यामुळे वाहतुकीला येत असलेला अडथळा व त्यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी सुरु असलेले सावळी विहीर फाटा ते कोपरगाव रस्त्याचे काम योग्य नियोजन करून कामाला गती द्या. अन्यथा ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचा इशारा आ. आशुतोष काळे यांनी दिला आहे.



राष्ट्रीय महामार्ग ७५२ जी या महा मार्गावरील कोपरगांव सावळीविहीर रस्त्याचे कामासाठी आ. आशुतोष काळे यांनी १९१ कोटी निधी मंजूर करून आणला आहे. परंतु, या महामार्गाचे काम सुरु झाल्यापासून आजतागायत या महामार्गाचे काम संबंधित ठेकेदार अत्यंत संथगतीने करीत असल्यामुळे सदर कामाची मुदत संपली असतांना देखील या महामार्गाचे काम पूर्ण होवू शकले नाही. तसेच काम करीत असतांना नियोजनाचा अभाव असल्यामुळे या महामार्गावर रहदारीला येणाऱ्या अडथळ्यामुळे अपघाताचे प्रमाण देखील वाढलेले असून नागरीकांना आपले प्राण गमवावे लागलेले आहे. त्यामुळे या रस्त्याने प्रवास करतांना नागरीकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

कोपरगाव मतदारसंघात मागील काही दिवसांपासून सातत्याने पडत असलेला पाऊस व या महामार्गावर पान ४

सबंधित ठेकेदार आणि अधिकारी देखील गंभीर नसून ठेकेदाराची कामाची मुदत संपलेली असतांना देखील अद्याप कामात सुधारणा झालेली नाही. त्यामुळे सुरु असलेले सावळीविहिर फाटा ते कोपरगाव रस्त्याचे काम योग्य नियोजन करून लवकरात लवकर पूर्ण करावे. अन्यथा ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहे.

**-आशुतोष काळे, आमदार**

# माजी मंत्री गडाखांच्या वाढदिवसानिमित्त तुफान गर्दी

## सोनईत विविध सामाजिक कार्यक्रमांनी वाढदिवस साजरा; दिग्गज मान्यवरांकडून शुभेच्छा

जनता आवाज वृत्तसेवा

**सोनई : माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या वाढदिवस २९ मे २०२५ रोजी हजारो कार्यकर्त्यांसह तालुक्यातील राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत व परिसरात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.**

नेवासा तालुक्यातील वांजोळी येथे माजी मंत्री शंकरराव गडाख मित्र मंडळाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. तर घोडेगाव कृषी उत्पन्न बाजार समिती उपआवारातही संचालक मंडळाच्या वतीने वृक्षारोपण केले.

यावेळी ग्रामीण भागातील रुग्णांसाठी घर पोहोच रुग्णालय सेवा डॉ. बाबासाहेब शिरसाठ सोनई यांच्या फिरत्या दवाखान्याचे लोकार्पण माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच तालुक्यातील विविध रुग्णालयामध्ये रुग्णांना फळे वाटप आदी उपक्रम राबविण्यात आले. काल, सकाळी ९ ते दुपारी १:३० वाजेपर्यंत नेवासा तालुक्यातील विविध गावांतील विविध संस्थाचे पदाधिकारी, महाराज, तरुण,ज्येष्ठ कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, शेतमजूर, शेतकरी यांनी भेट देत माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देवून अभिष्टचिंतन केले.



यावेळी महंत सुनीलगिरी महाराज, महंत आवेराज महाराज, पंढरीनाथ महाराज तांदळे, रमेशानंदगिरी महाराज, ज्ञानेश्वर महाराज तांबे, के. एम. बाबा फाटके, नामदेव महाराज कोरडे, ब्रम्हकुमारी उषादिदी या हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

सोशल मीडियात आ. आदित्य ठाकरे, खा. ओमराजे निंबाळकर, आ. धीरज देशमुख, आ. कैलास पाटील यांच्यासह जिल्ह्यातील अनेक पक्षाच्या नेत्यांनी तसेच पदाधिकाऱ्यांनी शंकरराव गडाख यांना शुभेच्छा दिल्या.

जिवाभावाची माणसे व कार्यकर्त्यांचे प्रेम ही माझी ऊर्जा आहे. सर्वसामान्य जनतेला केंद्रस्थानी मानून सत्ता असो व नसो. जनसेवेसाठी सदैव कटिबद्ध आहे. पावसाचे वातावरण असून देखील मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानतो.

**- शंकरराव गडाख, माजी मंत्री**

**सत्ता नसतांनाही तुफान गर्दी**

शंकरराव गडाख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी तालुक्यातील हजारो लोकांनी त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात गर्दी केली होती. राहुरी-शिंगणापूर रस्तावर वाहतुकीची कोंडी झाली होती. महायुतीच्या सुनामी लाटेत गडाखांचा विधानसभेला पराभव झाला. सत्ता नसतांनाही एवढी गर्दी जमा झाली होती.

# शिक्षकाने वाचविली खड्ड्यांपासून शेकडो वाहन

## डॉ. बागुल यांनी ड्रेनेज खड्ड्यांवर बसविली झाकणे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** मंगळवारी दुपारी शहर भागात जोरदार प्रमाणात पाऊस झाला. शनी चौकातून माळीवाडयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर ड्रेनेज चेंबरची झाकणे पाण्याच्या दबावामुळे बाजूला पडली. चेंबर उघडे पडून मोठे खड्डे तयार झाले. पाण्याचा अंदाज न आल्याने काही जण वाहनासकट खड्ड्यांमध्ये पडू लागले.



चौकात वृत्तपत्र घेण्यासाठी आल्यामुळे व पावसामुळे शिक्षक डॉ. अमोल बागुल यांना तेथेच आडोशाला थांबावे लागले. परंतु वाढत्या पावसात येणारी जाणारी वाहने, माणसे पाहून जणू काय ट्राफिक पोलीसासारखे खड्डे व रस्ता नियंत्रणाचे सुमारे तीन तास भर पावसात त्यांनी काम केले.

पाऊस थांबल्याशिवाय गत्यंतर नव्हते. मग शेकडो माणसे व वाहने खड्ड्यांमध्ये पडण्यापासून वाचवण्याचे काम त्यांनी हाती घेतले. प्रसंगी पाण्यामुळे त्यांच्या बंद पडलेल्या गाड्या देखील त्यांनी ढकलल्या. दोन्ही बाजूंच्या काही वाहने व माणसांना परस्पर माघारी देखील पाठवले.

जवळच भंगारात पडलेले मोकळे बाकडे खड्ड्यांवर टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु पाण्याच्या अतिप्रवाहामुळे तेही वाहून जाऊ लागले. रस्ता अडवल्यामुळे काही वाहन चालकांची बोलणी देखील खावी लागली. बागुल यांनी हे काम नेटाने चालू ठेवले. पाऊस संपून पाणी ओसरल्यानंतर त्यांनी घरचा रस्ता धरला.

दोन राष्ट्रपती पदके व हजारो पारितोषिकांनी डॉ. बागुल सन्मानित असून आपत्ती व्यवस्थापन व वाहतूक नियंत्रणाची त्यांनी प्रशिक्षणे घेतलेली आहेत. वेळेचे भान राखत शिक्षकाने भर पावसात केलेली ही सकारात्मक कृती चर्चेचा विषय ठरत आहे.

# आ. पवार यांच्या पाठबळामुळे बससेवा सुरू

## पुण्यश्लोक एक्सप्रेस चौंडी-इंदौर एसटी बस सेवेला प्रारंभ



> जामखेड-चौडी ते इंदोर ही बस गेल्या अनेक वर्षांपासून बंद होती. ही एसटी बस सुरू व्हावी, यासाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला होता. तसेच आ. रोहित पवार यांच्या पाठबळामुळेच ही बस सेवा सुरू झाली आहे.
>
> **- पांडुरंग माने**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी चौंडीवरून चौंडी ते इंदौर अशी नवीन बससेवा चालू व्हावी, यासाठी पांडुरंग माने यांनी अहिल्यानगरचे राजेंद्र जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती. अखेर त्यांच्या मागणीला यश आले असुन नुकतीच चौंडी ते इंदौर बससेवा सुरू करण्यात आली आहे.

पांडुरंग माने यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश आले असून जामखेड-चौडी ते इंदोर ही बस गेल्या अनेक वर्षांपासून बंद होती. ही एसटी बस सुरू व्हावी, यासाठी प्रशासनाकडे माने यांनी वारंवार पाठपुरावा करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीदिनाचे औचित्याने एसटी महामंडळाच्या वतीने जामखेड बस आगार अंतर्गत चौंडी ते इंदोर (पुण्यश्लोक एक्सप्रेस) प्रवाशी बस सेवेचा प्रारंभ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष युवा नेते पांडुरंग माने याच्या हस्ते श्रीफळ वाढून संपन्न झाला.

यावेळी पांडुरंग माने, चालक दहिफळे, नितीन काशिद, आ. पवार यांचे स्वीय सहायक निकाळजे, कुंडल राळेभात, सचिन शिंदे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

# निकालापूर्वीच 'अशोक'च्या विद्यार्थ्यांची कंपन्यामध्ये वर्णी




**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपुर :** माजी आ. भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखालील अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अशोक पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या मॅकेनिकल इंजिनिअरिंग शाखेतील अंतिम वर्षाच्या निकालापूर्वीच विद्यार्थ्यांची विविध नामांकित आंतरराष्ट्रीय कंपन्यामध्ये निवड झाली आहे, अशी माहिती प्राचार्य अंजाबापू शिंदे यांनी पत्रकात प्रसिद्धी दिली.

त्यामध्ये हरमन इंटरनॅशनल इंडिया प्रा. लि. चाकण, बॉश चेसिस प्रा. लि. पुणे, बजाज ऑटो प्रा.लि. पुणे, एल अँड टी कंपनी पुणे, किर्लोस्कर पुमेटीक पुणे, बजाज ऑटो प्रा.लि. पुणे, टाटा ऑटो कॉम प्रा. लि.पुणे व इगल हायटेक कॉर्पोरेट प्रा.लि. पुणे या नामांकित कंपन्यांनी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल मार्फत महाविद्यालयात येऊन प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे नोकरीसाठी निवड केली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीकडून चांगल्या प्रकारे वार्षिक पेकेज, मोफत राहण्याची, जेवणाची व प्रवासाची सुविधा देण्यात आलेली आहे.

प्राचार्य अंजाबापू शिंदे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. अरुण कडू, विभाग प्रमुख प्रा. सचिन कोळसे आदी विभाग प्रमुख, शिक्षकाचे मार्गदर्शन लाभले.

आज भारतासह जगाला कुशल मनुष्यबळाची गरज आहे. ही गरज लक्षात घेता अधिकाअधिक युवकांना कौशल्याधारित शिक्षणाची गरज आहे. ज्ञानार्जन करताना विद्यार्थ्यांमधील कौशल्यातील दरी भरून काढण्यासाठी आणि सर्वसमावेशक वृध्दीला चालना देण्यासाठी अशोक पॉलिटेक्निक बहुराष्ट्रीय कंपन्याशी करार करण्याचा संस्थेचा मानस आहे. हे एक महत्वपूर्ण पाऊल टाकले असून महाराष्ट्राच्या वाढीसाठी आणि समृद्धीसाठी या कराराचे महत्व अधोरेखित होणार आहे.

> **दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक**
>
> संस्थेचे संस्थापक माजी आ. भानुदास मुरकुटे, अध्यक्ष कोंडीराम उंडे, योगेश विटनोर, सोपानराव राउत, विरेश गलांडे, युवक नेते सिद्धार्थ मुरकुटे, कार्यकारी अधिकारी मंजुश्री मुरकुटे, कारखान्याचे संचालक निरज मुरकुटे आदी संचालक मंडळ यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

> महाविद्यालयाने यावर्षी अंतिम वर्षातील सर्वच शाखेतील १०० पेक्षा जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यामुळे पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. प्लेसमेंटसाठी संस्था व महाविद्यालय कायमच प्रयत्नशील आहे.
>
> **- मंजुश्री मुरकुटे, कार्यकारी अधिकारी**

# नवजीवन पतसंस्थेच्या चेअरमनपदी घोडके

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** नवजीवन मागासवर्गीय सहकारी पतसंस्था मर्या. श्रीगोंदा या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२५-३० साठी कार्यकरणी सदस्यपदी ज्ञानदेव कोकाटे, विवेकानंद राऊत, विश्वास घोडके, महावीर पटवा, गोरख घोडके, संपत घोडके, राजेंद्र मखरे, पांडुरंग डेबरे, अशोक घोडके, चित्रा घोडके, अर्चना ढवळे, साहेबराव बनकर यांची बिनविरोध निवड होऊन चेअरमनपदी अशोक भानुदास घोडके तर व्हा. चेअरमनपदी विवेकानंद राऊत यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



याप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक मुंडे यांनी काम पाहिले. चेअरमनपदी अशोक घोडके व व्हा. चेअरमनपदी विवेकानंद राऊत यांची फेरनिवड झाल्याने त्यांचावर सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

यावेळी भागचंद घोडके, लक्ष्मणराव घोडके, अध्यक्ष जीवा घोडके, नगरसेवक संग्राम घोडके, अंबादास औटी तसेच संस्थेचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक व सभासद बहुसंख्येने उपस्थित होते.

# गरजवंत दिव्यांग व्यक्तीला मदतीचा हात

## माजी खा. सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नातून दिली सायकल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव :** माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या अथक प्रयत्नातून व डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित प्रधानमंत्री दिव्याशा केन्द्र, अहिल्यानगर यांचे कडून आसान दिव्यांग संघटनेचे संस्थापक संजय साळवे यांच्या विशेष प्रयत्नातून श्रीरामपूरचे दिव्यांग जगदीश पाटील यांना दिव्यांग योजने अंतर्गत मोफत बॅटरीवरील सायकल जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे संचालक डॉ. अभिजित दिवटे व जिल्हा समन्वयक डॉ. दिपक अनाप यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आली.

जगदीश पाटील हा दिव्यांग अतिशय मेहनती व कष्टाळू आहेत. बेलापूर रोडला हातगाडीवर व्यवसाय करून स्वतः चा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. अपंग सामाजिक विकास संस्थेचे चेअरमन संजय साळवे यांच्या नजरेत जगदीशची धडपड लक्षात आली आणि तातडीने प्रयत्न सुरु केले.

माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी तातडीने मागणी पूर्ण केली आणि दिव्यांग जगदीशला नवी आशा नवी दिशा मिळाली सहायक साधनांच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तीचे जीवन सुखकर व आनंदी बनवल्याबद्दल डॉ. सुजय यांचे वर्षा गायकवाड व आसान दिव्यांग संघटना पदाधिकारी यांनी आभार मानले.




# संजय कोठारींनी केली जखमींना मदत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड शहराजवळील खर्डा रोडवर दुपारी १२ वाजता दोन दुचाकी सामोरासमोर धडकून झालेल्या अपघातात तीन जण जखमी झाले असून तीघांना जबर मार लागला आहे.

यापैकी दिलीप भगवान कराळे (वय ६०, बाळगव्हाण) त्यांना पायाला मार लागला आहे. शर्वरी संतोष काळदाते (वय १२, राजुरी), मंगल अशोक कराळे (वय ३२, बाळगव्हाण) यांनाही मार लागला आहे.



सदर अपघाताची माहिती सागर नेटके यांनी सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना दिली. संजय कोठारी हे केवळ पाच मिनिटात आपली रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळी दाखल झाले. यावेळी रुग्णवाहिकेतून सर्व जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू आहे.

सदरची माहिती कोठारी यांनी पोलीस निरीक्षक महेश पाटील यांना दिली असून पुढील चौकशीसाठी पोलिसांना पाठवण्यात आले आहे.

> संजू कोठारी यांना मी फोन केल्याबरोबर पाच मिनिटात स्वतः रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळी दाखल झाले. त्यामुळे जखमींना लवकर मदत झाली.
>
> **- सागर नेटके**

# ऐतिहासिक ठेवा भविष्यासाठी गरजेचा

## अल्तमश जरीवाला ; नगरचा स्थापना दिन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जगात एकमेव शहर असा आहे ज्याला स्थापन दिवस लाभलेला आहे. म्हणून आज आम्ही सर्व नगरकरांना स्थापन दिवस साजरा करण्याच्या एक अभिमान वाटतो.

अहमदनगर शहराची स्थापना कधी व कोणी केली याची इतिहासात नोंद असल्याने गेल्या ५०० पेक्षा जास्त वर्षाच्या अहमदनगरचा स्थापना दिवस साजरा होतो ही ऐतिहासिक बाब आहे. त्याकाळी अहमदनगर शहराची गणना जगातील मोजक्याच शहराबरोबर करण्यात येत असत. इतके वैभवशाली असे अहमदनगर होते. काळाचे उगाच अनेक ती स्थित्यांतरे पाहिलेल्या अहमदनगर शहरातील सर्व ऐतिहासिक वस्तूंचे जतन करणे गरजेचे आहे.

हा ऐतिहासिक ठेवा पुढील पिढीला माहिती होण्यासाठी सर्वांच्या एकत्रित प्रयत्नाची गरज आहे त्यासाठी आम्ही पुरातन विभागाशी संपर्क करून या ऐतिहासिक वास्तूंच्या जतन करण्यासाठी प्रयत्न करू तसेच अहमदनगर शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या कबरीवर जाणारा रस्ता करण्यासाठी पाठपुरावा करू, असे प्रतिपादन अहमदनगर युवा फाउंडेशन ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष अल्तमश जरीवाला यांनी केले.

# शिवना नदीवरील पुलाचे काम प्रगतीपथावर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापुर :** राज्य क्रमांक २१६ वरील काटे पिंपळगाव व शंकरपूर शिवारातील शिवना नदीवरील अत्यंत महत्त्वाचा असलेला पुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

गंगापूर वैजापूर या दोन्ही तालुक्याला जोडणारा हा पूल महत्वाचा असून विद्यार्थी, शेतकरी व दळणवळनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा ठरणार आहे. शिवना नदीचे पात्र खूप मोठे आहे. पावसाळ्यात नदीला पाणी आल्यानंतर नागरिकांची खूप गैरसोय होत होती. काही दिवसात पूल झाल्यानंतर नागरिकांना, शेतकऱ्यांना व विद्यार्थ्यांना निश्चित दिलासा मिळेल, यात शंका नाही.





# अज्ञातांनी घरासमोर लावलेली मोपेडची केली चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** घराच्या समोर, रस्त्याच्या कडेला हॅण्डल लॉक करुन लावलेली सुझुकी कंपनीची एक्सेस मोपेड (क्र. एम एच १६ डी के १९५९) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना सिद्धार्थनगर येथील गणपती मंदिराजवळ २७ मे रोजी रात्री ते २८ मे रोजी सकाळी साडेपाच वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी सचिन पोपट सीतापुरे (वय ४२ रा. घर नंबर २३, पहिली चाळ, गणपती मंदिरा शेजारी, सिद्धार्थनगर, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०५ (ब ) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार महादेव गरड हे करीत आहेत.



# बनावट नोंदणी करून चक्क दहा कोटीचा अपहार?

## पोलीस अधीक्षकांकडे तक्रार; तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहरातील इलाईट इंटरनॅशनल या फर्ममध्ये काम करणाऱ्या अकाउंटंटने त्याच्या साथीदाराच्या मदतीने फर्मच्या टॅली सॉफ्टवेअरमधील नोंदींमध्ये फेरफार करून, बनावट नोंदी करून तब्बल नऊ कोटी ८१ लाख ६६ हजार ९५७ रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार समोर आला आहे.

जानेवारी २०२० ते जानेवारी २०२५ या कालावधीत हा अपहार झाला असून, या प्रकरणी दोघांवर मंगळवारी (२७ मे) रात्री तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अभिजीत विनोद गांधी (वय ३८, रा. कराचीवाला नगर, अहिल्यानगर) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. पुनित अभयराज गुगळे (रा. कोर्ट गल्ली, अहिल्यानगर), अन्सार निसार शेख (रा. गजराजनगर, छत्रपती संभाजीनगर रस्ता, अहिल्यानगर) या संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संशयित पुनीत हा अकाउंटंन्ट म्हणून इलाईट इंटरनॅशनल या फर्ममध्ये काम करत असताना त्याने फर्मच्या अकाउंटचा युजर आयडी वापरून, फर्मच्या संपूर्ण टॅली सॉफ्टवेअर मधील व्यवहाराच्या खोट्या नोंदी दाखवल्या.

त्याच्या जवळच्या व्यक्तीशी हातमिळवणी करून वेगवेगळ्या बनावट नोंदी करून कस्टम ड्युटी, इन्कम टॅक्स, इन्शुरन्स पॉलिसी, कंपनीचे सप्लायर्स अशांच्या नावाने खात्यावर पैसे ट्रान्सफर केले असे दाखवले.

मात्र, सदरच्या रकमा या त्याने त्याच्या नातेवाईकांच्या व ओळखीच्या व्यक्तींच्या खात्यावर वर्ग केल्या. तसेच, मिनिस्ट्री ऑफ फायनान्स भारत सरकार यांचे बनावट पत्र तयार करून या विभागाला ४८ लाख रूपये भरणा केल्याचे दाखविले.

फिर्यादीने याबाबत खात्री करून संशयित आरोपीकडे चौकशी केली असता, त्याने २४ लाख रूपये पुन्हा फर्मच्या नावे टाकले. दरम्यान, फिर्यादीने खात्री केली असता शासनाच्या कोणत्याही खात्यावर अशा प्रकारे टॅक्स भरणा होत नसल्याचे समोर आले. त्यामुळे खोट्या नोंदी घेऊन, बनावट सहीचे पत्र बनवून फिर्यादी व शासनाची फसवणूक केल्याची व ९ कोटी ८१ लाख ६६ हजार ९५७ रूपयांचा अपहार केल्याची तक्रार पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली होती.

या तक्रारीची चौकशी होऊन तोफखाना पोलिस ठाण्यात मंगळवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एम. एन. गोटला हे करत आहेत.

# अन्यथा नेवासा बसस्थानक बंद करणार

## प्रवासी संघटनेचा इशारा; अधिकाऱ्यांना दिले निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा आगाराला नवीन किमान १० बस उपलब्ध करून द्याव्यात, तसेच बस स्थानकावर प्रवाशांना भेडसावणाऱ्या मूलभूत सुविधांची तातडीने पूर्तता करावी, अन्यथा सोमवार दि. १६ जून २०२५ रोजी नेवासा बस स्थानक बंद आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नेवासा तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष अनिल दिनकरराव ताके यांनी दिला आहे.


या मागण्यांसाठी परिवहन विभागाच्या विभाग नियंत्रक, अहिल्यानगर यांना निवेदन देण्यात आले असून, त्याची प्रत राज्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, परिवहनमंत्री प्रतापसिंह सरनाईक, आमदार विठ्ठलराव लंघे तसेच जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलिस निरीक्षक व इतर संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नेवासा हे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असून, येथे मोठ्या प्रमाणात भाविक आणि प्रवासी ये-जा करतात. मात्र, स्थानकावर आणि आगारात नादुरुस्त व जुन्या बस, चालक-वाहकांची कमतरता, तसेच पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, कँटीन यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

'मागण्यांबाबत वेळोवेळी निवेदने देऊनही दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे यावेळी नेवासा तालुक्यातील भाविक, प्रवासी आणि स्थानिक जनतेसह सोमवार, दिनांक १६ जून रोजी नेवासा बस स्थानक बंद आंदोलन करण्यात येईल', असा स्पष्ट इशारा ताके यांनी दिला आहे.

### संघटनेच्या या आहेत मागण्या

नेवासा आगारासाठी नवीन किमान १० बस तत्काळ उपलब्ध कराव्यात.सध्या ७८ चालक आणि ७४ वाहक कार्यरत असून, आणखी ७ चालक व ७ वाहकांची तात्काळ नेमणूक करण्यात यावी. बंद झालेली श्री क्षेत्र देवगडपंढरपूर बससेवा पुन्हा सुरू करावी. आगारात मेंटनन्ससाठी येणाऱ्या १६ बसमुळे मोठ्या प्रमाणात प्रवासी गर्दी होते, त्यामुळे स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी व अधिकृत कँटीनची व्यवस्था करावी.महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी बस स्थानकावर स्वतंत्र वॉचमनची नियुक्ती करण्यात यावी.



# महावितरणची डीपी कुऱ्हाडीने फोडली



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** तालुक्यातील कोरेगाव येथे सिद्धेश्वर क्रमांक दोनची डीपी दत्तात्रय भगवान नेटके व भगवान नेटके यांनी कुऱ्हाडीच्या साह्याने तोडली. यामुळे परिसरातील वीजपुरवठा तीन दिवसांपासून बंद पडला आहे.

याप्रकरणी संबंधित व्यक्तीवर कारवाई करावी अशी मागणी संतोष बबन शेळके, चरण परदेशी, काका नेटके, चंदूसिंग परदेशी, लक्ष्मण मुरकुटे, शंकर वाघ, सोमनाथ शेळके, गुलाब मुरकुटे, सूर्यभान थोरात, आजिनाथ शेळके, संतोष सिंग परदेशी, प्रल्हाद शेळके, नंदूसिंग परदेशी, लक्ष्मण शेळके, विश्वनाथ धस, छाया जाधव व प्रदीप रुद्रके या शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

या तक्रारी अर्जामध्ये शेतकऱ्यांनी म्हटले आहे की, कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथे सिद्धेश्वर डीपी क्रमांक दोन ही सुरळीत सुरू होती. यावर अनेक शेतकरी आहेत,असे असताना दत्तात्रय नेटके व भगवान नेटके या दोघांनी सर्व शेतकऱ्यांच्या समक्ष डीपी चे वीजपुरवठा बंद करून कुऱ्हाडीच्या साहाय्याने ती तोडली आहे. संबंधित व्यक्तीवर कारवाई करून वीजपुरवठा तात्काळ सुरळीत सुरू करून द्यावा, अशी मागणी केली आहे.

# युवानेते विवेक कोल्हे यांच्या हस्ते सत्कार

## श्री गणेश विद्यालयांमध्ये नुतन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** श्री गणेश विद्या प्रसारक मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या सहा विद्यालयांच्या स्थानिक स्कूल कमिटी कार्यकारणीवर पदाधिकारी आणि सदस्य नियुक्त करण्यात आलेले असून, नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार जिल्हा बँकेचे संचालक युवानेते विवेक कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांनी सर्वांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि संस्था उत्कृष्ट शैक्षणिक सुविधा निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

श्रीमती नादरबाई आनंदराव देशमुख माध्यमिक विद्यालयात अध्यक्षपदी अभिजीत देशमुख, उपाध्यक्षपदी सचिन वाबळे यांची निवड झाली आहे. राजमाता जिजाऊ माध्यमिक विद्यालय, गणेशनगर येथील समितीचे अध्यक्ष जनार्दन गाढवे तर उपाध्यक्ष राजेंद्र गाढवे आहेत. लक्ष्मीनारायण माध्यमिक विद्यालय, वाकडी येथील अध्यक्ष नवनाथ शेळके व उपाध्यक्ष डॉ. वसंतराव लबडे यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

जय हनुमान माध्यमिक विद्यालय, रांजणगाव देशमुख येथे अध्यक्ष म्हणून प्रकाश गोर्डे व उपाध्यक्ष अरुण वर्पे यांची निवड झाली. श्री ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय, केलवड येथील अध्यक्ष सुरेश गमे व उपाध्यक्ष विठोबा राऊत यांच्यावर कामकाजाची जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच, श्री छत्रपती शंभूराजे माध्यमिक विद्यालय, पिंपळवाडी येथे अध्यक्ष वाल्मीक तुरकणे व उपाध्यक्ष गणपतराव धरम यांची निवड झाली आहे.

यावेळी श्री गणेश कारखाना चेअरमन सुधीरराव लहारे, व्हा. चेअरमन विजयराव दंडवते आणि सर्व संचालक मंडळ तसेच श्री गणेश विद्या प्रसारक मंडळातील पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.



# वळूच्या झुंजीत एकजण गंभीर जखमी

## मोकाट जनावरांवर नियंत्रणाची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** शहरातील गांधी चौकात वळूंच्या झुंजीने थरार निर्माण केला. या झुंजी दरम्यान अभिजीत गुजर हे गंभीर जखमी झाले आहेत. दोन वळूंची झुंज दीड तास सुरु राहिल्याने या भागातील नागरिकांचा व वाहतुकीचा मार्गही बंद झाला होता.

सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास दोन वळू गांधी चौकात एकमेकांवर तुटून पडले. गांधी चौकामध्ये चार रस्ते एकत्र असल्याने मोठी रहदारी असते. सकाळी असणारे दुध उत्पादक शेतकरी व इतरही लोकांना या झुंजीचा मोठा त्रास झाला. नागरिक या प्रकाराकडे पाहत थांबले असताना, काहींच्या अंगावरही वळू धावत गेल्याने एकच घबराट उडाली. याच दरम्यान अभिजीत गुजर हे आपली दुचाकी गाडी बाजूला काढत असताना, पळत सुटलेल्या वळूने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत ते खाली पडून गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

गांधी चौकासारख्या मध्यवर्ती नागरी वस्ती आणि वर्दळीच्या ठिकाणी ही घटना घडल्याने नागरीकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. नागरिकांनी पाथर्डी नगरपरिषदेवर मोकाट जनावरांवर नियंत्रण ठेवण्यात अपयश आल्याचा आरोप केला आहे.



### नगरपरिषदेचे होतेय दुर्लक्ष

नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे मोकाट जनावरे शहरात बिनधास्तपणे वावरत असून, केवळ अपघातच नव्हे तर शेतकऱ्यांच्या शेतीतील उभ्या पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान करत आहेत. शहर परिसरातील शेतकरीही या समस्येमुळे त्रस्त आहेत. शहरात मोकाट जनावरांचा वावर वाढला असून, अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# गंडा घालणारा केला गजाआड

## शेअर मार्केटच्या नावाखाली केली होती फसवणूक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेअर मार्केटच्या नावाखाली १ लाख ३८ लाखांचा गंडा घालणाऱ्या आरोपीस शेव-गाव पोलिसांनी गजाआड केले आहे. गेल्या ७ महिन्यांपासून हा आरोपी पसार होता.

पंकज उर्फ भारत जैस्वाल असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, आरोपीने सुर्यकोटी मल्टीस्टेट निधी लिमीटेड नावाची पतसंस्था पतपेढी या नावाने मुंगी ता. शेवगाव गावातील पेठेमध्ये पतसंस्थेच्या नावाखाली शेअर मार्केटचे ऑफिस उघडले होते. शेअरमध्ये रककम गुंतविल्यास जादा रकमेचे अमिष त्याने दाखविले. या अमिषाला बळी पडुन अशोक गणपत शेळके यांनी या कंपनीत १,३८,००,००० रुपयांची गुंतवणूक केली होती.




परंतु आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती.

यानंतर पोलिसांनी प्रशांत भारत जैस्वाल यास अटक केली होती. परंतु दुसरा आरोपी पंकज उर्फ भारत जैस्वाल हा गेल्या सात महिन्यांपासून गुंगारा देत होता. सदरचा आरोपी हावडोज बाजार (ता. फुलंब्री, जिल्हा छत्रपती संभाजीनगर) येथे हॉटेल मध्ये काम करत असल्याची गुप्त माहीती मिळाल्याने पोलीस निरीक्षक समाधान नागरे यांनी पोलीस पथक तयार करुन या गावाला रवाना करण्यात आले होते.

हॉटेलमध्ये पोलीस आल्याची चाहुल लागताच मोटार सायकलवरुन पळुन जात असतांना त्याला शेवता रोड येथे शिताफिने ताब्यात घेवून शेवगाव पोलीस स्टेशन येथे आणुन नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. वरिल आरोपी हा गुन्हा दाखल झाल्यापासुन मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात अशा विविध राज्यात वास्तव्य करत होता याची कबुली दिली आहे.

# १० दिवसीय बौद्धाचार्य श्रामणेर शिबिराचे शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर दक्षिण जिल्हा अंतर्गत नगर तालुक्याच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक न्यू टिळक रोड अहिल्यानगर या ठिकाणी जिल्हा शाखा, शहर शाखा व तालुका शाखेच्या सर्व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत १० दिवसीय बौद्धाचार्य श्रामनेर शिबिराचे नगर तालुका अध्यक्ष आयु. नितीन शिवाजी साळवे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन झाले व बौद्धाचार्य श्रामणेर शिबिरार्थींना चिवरदान करून त्रिशरण पंचशील देताना राष्ट्रीय सचिव भिख्खू महासंघचे भंते ए. सुमेधबोधि, केंद्रीय शिक्षक ए. जी. तायडे गुरुजी, जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे आदिंसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# सरकारचा शेतकऱ्यांना मोठा दिलासा

## आ. काळे; दस्त नोंदणीचा निर्णय स्वागतार्ह

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी:** महायुती शासनाने राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तास लागणारी नोंदणी फी माफ करण्याचा घेतलेला निर्णय संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांसाठी आनंदाचा आणि दिलासादायक असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी म्हटले आहे.



ग्रामीण भागात एकत्र कुटुंब पद्धतीमुळे कुटुंबातील एका व्यक्तीच्या नावावर असलेली शेतजमीन कुटुंब विभक्त झाल्यानंतर कुटुंबातील इतर व्यक्तीच्या नावावर करणे अपरीहार्य असते. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीची आपापसात स्वखुशीने जरी वाटणी करायची असेल तर किंवा शेत जमीन एका व्यक्तीच्या नावावरून दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर करण्यासाठी एकूण रेडीरेकनरच्या एक टक्के किंमत मोजावी लागत होती. हा मोठा खर्च टाळण्यासाठी कित्येक शेतकरी दस्तांची नोंदणी टाळत होते व बहुतांश वेळा अनेक कुटुंब समन्वय ठेवून कुटुंबाची शेत जमीन हि मोजक्याच व्यक्तींच्या नावावर ठेवत होते.

परंतु कुटुंबातील इतर व्यक्तींच्या नावे नोंदणीच नसल्याने भविष्यात शेत जमिनीच्या बाबतीत कुटुंबात कलह, वाद निर्माण होवून पुढे कायदेशीर वाद व पेच प्रसंग निर्माण होवून त्याचा शेतकऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना नाहक त्रास भोगावा लागतो. याबाबत महायुती शासनाने यावर तोडगा काढण्यासाठी व शेतकऱ्यांना होणाऱ्या त्रासातून कायमची मुक्तता करण्यासाठी महसूल विभागाने शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तास लागणारे नोंदणी शुल्कच माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.


# देवाभाऊ कुस्ती स्पर्धा ४ व ५ जूनला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव येथे देवाभाऊ कुस्ती स्पर्धेचे २८ व २९ मे रोजी आयोजन केले होते. परंतु पावसाच्या संततधारेमुळे या स्पर्धा तात्पुरत्या स्थगित करून ४ व ५ जून रोजी आयोजित केल्या आहेत. तरी याची सर्व कुस्ती स्पर्धकांनी व कुस्तीप्रेमींनी नोंद घ्यावी, असे भाजपाचे प्रदेश सचिव तथा वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष अरुण मुंढे यांनी दिली.

मुंढे म्हणाले की, ठरलेल्या नियोजनाप्रमाणे स्पर्धेचे बक्षीस वितरण दि. ५ जून रोजी सायंकाळी ६ वाजता राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार आहे. तसेच महाराष्ट्र, विधान परिषद सभापती राम शिंदे व जलसंपदा मंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा सत्कार समारंभ होणार आहे. राष्ट्रीय पदक विजेती उषा कुमारी विरुद्ध राष्ट्रीय पदक विजेती सोनाली मंडलीक यांच्यात एक लाख रुपयांवर निमंत्रित कुस्ती होणार आहे ०९ वजनीगटातील कुस्त्यांमध्ये विजेत्यांना रोख रकमेची बक्षीस देण्यात येणार आहे ५००० ते ५१ हजार रुपयापर्यंतचे रोख बक्षीस देण्यात येणार आहे. प्रथम क्रमांकाच्या विजेतास चांदीची गदा प्रदान करण्यात येणार आहे. तसेच सर्व विजेत्या मल्लांना विशेष चषकांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकअरुण भाऊ मुंढे यांनी दिली.

स्पर्धेचे खास आकर्षण म्हणजे मल्लांची निमंत्रित थरारक कुस्त्या होणार आहेत. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध दिल्लीचा रुस्तम-ए -हिंद अजय बनवाल यांच्यात दोन लाख रुपयांच्या बक्षिसावर रंगणारी कुस्ती प्रमुख आकर्षण ठरणार आहे. तसेच महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध महाराष्ट्र केसरी हर्षद सदगीर यांच्या दीड लाख रुपयांची कुस्ती होणार असून महिला विभागातही जबरदस्त झुंज पाहायला मिळणार आहे.



# गायीचे धार्मिक पद्धतीने अंत्यसंस्कार

## लोणी खुर्द येथील शेतकऱ्याचा अनोखा आदरभाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** भारतीय संस्कृतीत आणि विशेषतः हिंदू धर्मात गाईला पूजनीय स्थान आहे. याच धार्मिक श्रद्धेचे अत्यंत संवेदनशील आणि अनुकरणीय दर्शन लोणी खुर्द येथील प्रगतिशील शेतकरी संजय कुशिनाथ आहेर यांनी घडवले. त्यांनी प्रसूतीनंतर आजारी पडलेल्या आणि एक महिन्याच्या उपचारांनंतर मृत्यू पावलेल्या आपल्या दुभत्या गाईचे पारंपरिक हिंदू धार्मिक विधीनुसार अंत्यसंस्कार करून अनोख्या श्रद्धांजलीचे उदाहरण सादर केले.

आहेर यांची चौथ्या वेताची होती दररोज ३० ते ३५ लिटर दूध देणारी गाय प्रसूतीनंतर झालेल्या गुंतागुंत निर्माण होऊन तिची प्रकृती खालावली. पशुवैद्यक डॉ. श्रीकांत घोरपडे यांनी अखेरच्या क्षणापर्यंत प्राण वाचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले, मात्र दुर्दैवाने ते निष्फळ ठरले.

गाईप्रती असलेल्या आत्मीयतेने प्रेरित होऊन संजय आहेर, त्यांचे बंधू बाळासाहेब व विजय आहेर यांनी गाईचे विधीवत धार्मिक अंत्यसंस्कार केले.अंत्यसंस्कारावेळी गावातील शिवाजीराजे आहेर, गोपीनाथ आहेर, सोमनाथ आहेर, अशोक शिंदे, शिवाजी आहेर, महेश आहेर आदींच्या उपस्थितीत भजनगायन करत गाईला सन्मानपूर्वक अंतिम निरोप देण्यात आला.साई निर्माण ग्रुपचे किरण आहेर आणि इतर सदस्य तसेच आहेर कुटुंबातील नातेवाईक आणि ग्रामस्थांनी या श्रद्धांजली कार्यक्रमात सहभाग घेतला.

# पुणतांबा चौफुली परिसरात दुरुस्ती करा

## अन्यथा तीव्र आंदोलन करणार - वैभव आढाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** शहरालगत असलेल्या पुणतांबा चौफुली जवळील रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे निर्माण झाले आहेत. या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनधारकांचे जिवित धोक्यात आले आहे. नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी अपघातात एका महिलेस आपला प्राण गमवावा लागल्याच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष वैभव आढाव यांच्या वतीने संबंधित विभागाकडे तातडीने दखल घेऊन रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

एकीकडे मतदारसंघाच्या विकासाचा भ्रमनिरास दिवसेंदिवस लोकप्रतिनिधी करत आहेत. कोट्यवधीच्या वल्गना झाल्या पण दुर्दैवाने कामे अतिशय निकृष्ट असल्याचा प्रकार समोर येतो आहे. या अपघातांचे दायित्व लोकप्रतिनिधींनी घ्यावे कारण त्यांच्या उद-ासीन धोरणामुळे सदर दुर्दैवी वेळ मतदारसंघाच्या नागरिकांना भोगावी लागते आहे, याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे.

सदर रस्ता हा नगर मनमाड महामार्गाचा भाग असल्याने, त्याच्या देखभालीची जबाबदारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची आहे. मात्र, दीर्घकाळापासून या मार्गावरील दुरुस्तीचे काम पूर्णत्वास गेले नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. अपघातांमुळे जनतेत भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यातच पावसामुळे अधिक प्रमाणात अनेक वेळा दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक, महिला व विद्यार्थी यांना या खड्ड्यांमुळे धोका निर्माण झाला आहे.

या स्थितीमुळे कोपरगाव भाजपा शहराध्यक्ष वैभव आढाव यांनी मा. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक यांना पत्रव्यवहार केला आहे. या निवेदनात पुणतांबा चौफुली परिसरातील रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे वाहनांची वाहतूक अडथळाग्रस्त होत असून, अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



## संपादकीय

### किती काळ गप्प राहणार ?

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाने पुन्हा एकदा समाअजमन ढवळून काढले आहे. या विषयावर अनेक दिशांनी चर्चा होत आहे, मात्र खरोखरच हे प्रकार का आणि कसे टाळता येतील, हा परवलीचा प्रश्न प्रत्येक घरात आणि समाजात स्वतंत्रपणे चर्चिला जायला हवा. हुंड्यापायी सासरच्यांकडून होणाऱ्या पाशवी छळाला कंटाळून १६ मे २०२५ रोजी वैष्णवीने तिच्या भूकुम येथील घरी आत्महत्या केली. पोलिसांनी हगवणे कुटुंबियांवर हुंड्यासाठी छळ, कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप लावले आहेत. वडील अनिल कस्पटे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तिच्या सासरच्या मंडळींना भारतीय दंड संहितेच्या कलम ८० (हुंडा मृत्यू), १०८ (आत्महत्येस प्रवृत्त करणे), ३५२ (जाणीवपूर्वक अपमान), ३५१ (गुन्हेगारी धमकी) आणि कलम ३(५) सामान्य हेतू या गुन्ह्यानंतर्गत अटक केली. या सर्व प्रकरणात वैष्णवीच्या सर्वांगावर असलेल्या जखमा आणि संपूर्ण हगवणे कुटुंबाचा तिच्या छळात असलेला सहभाग पाहता तिच्या पालकांनी सर्व आरोपींवर मोक्का कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. वस्तुत: आज बहुतेक समाजात जन्मापासून संगोपन, लाड, प्रेम, शिक्षण आणि लग्न या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यामध्ये मुलगा तसेच मुलगी या दोघांना समान वागणूक आणि संधी दिली जाते. दोहोंच्या सुखासाठी पालक सर्वतोपरी प्रयत्न करत असतात. लग्नानंतर आपली मुलगी सासरी सुखा-समाधानाने नांदावी यासाठी पालक लग्न ठरवताना सहसा ओळखीतील, प्रतिष्ठित आणि सधन कुटुंबात तिचे लग्न लाऊन देतात. काही कारणाने भविष्यात मुलीचे सासरी पटले नाही, तर किमान तिला स्वतःच्या पायावर उभे राहता येईल, असे उच्च शिक्षण देण्याची जबाबदारी पालक पार पाडतात. मात्र तरीही हुंड्यापायी विवाहित तरुणींच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. अशा दुर्दैवी घटना मानवतेवर डाग आहेत. वास्तविक, चांगली नोकरी, व्यवसाय, शेती असलेल्या अनुरूप मुलाशी लग्न करून दिल्यावरही सासरच्यांकडून हुंड्यासाठी मुलीचा मानसिक आणि शारीरिक छळ होणे, ही सुसंस्कृत म्हणवणाऱ्या समाजासाठी निंदनीय बाब आहे. याला काही प्रमाणात मुलीचे पालकही जबाबदार ठरतात. राजकीयदृष्ट्या चर्चित, प्रतिष्ठित आणि सधन वर्गातील कुटुंबात मुलीचे लग्न लाऊन देणे, हा अनेक घराणी प्रतिष्ठेचा विषय करतात. हुंडा घेणे आणि देणे या दोन्ही कृती कायद्याने आहेत. यावर पळवाट म्हणून हे पालक जमीन, घर किंवा फ्लॅटसारखी स्थावर मालमत्ता मुलीच्या नावावर करून देणे, लग्नाचा खर्चिक हॉल-जेवणावळी, मुलीला स्त्रीधनाच्या नावाखाली ४०-५० तोळे सोने घालणे, मुलाला महागडी गाडी घेऊन देणे हे प्रकार करतात.

मुलाच्या घरची लाखोंची मालमत्ता असताना लग्नाची बोलणी करताना मुलीच्या पालकांकडून या अवाजवी वाटणाऱ्या गोष्टी ओरबाडल्यासारख्या घेणे आणि मुलीच्या पालकांनी त्या देणे खरेच आश्चर्यजनक आहे. मुलीच्या लग्नात इतकी खातिरदारी केल्यावरसुद्धा लग्नानंतर मुलीच्या पालकांकडून आर्थिक भेटींची अपेक्षा ठेवणे हे तर सासरच्यांच्या भिकारी वृत्तीचेच लक्षण ठरावे. पालकांकडून अजून मालमत्ता आणावी म्हणून घरात लक्ष्मी म्हणून आणलेल्या सुनेचा नवरा, सासु-सासरे, नणंद आणि तिच्या नवऱ्याकडून मानसिक आणि शारीरिक छळ होणे हे घृणास्पद कृत्य म्हणावे लागेल. सासरी पाठवणी केल्यावर आपल्या पोटच्या गोळ्यावर पालकांनी अशा प्रकारचे अत्याचार खपवून घेणे हे अनाकलनीय आहे. अशा वेळी तिला शिक्षण दिल्याचा, तिच्या लग्नावर लाखो रुपये खर्च केल्याचा काय फायदा होतो ही मुलींच्या पालकांनी विचार करण्यासारखी बाब आहे. संशयास्पद मृत्यु प्रकरणांमध्ये पालकांचे जबाब नोंदवून न घेणे, एफआयआरमध्ये चुकीची किंवा किरकोळ अपराधिक कलमे लावणे, घटनेचा तपास भलत्याच दिशेला नेणे या प्रकारांमुळे तपास यंत्रणांवर काही तरी दबाव असल्याचे स्पष्ट होत असते. अशा वेळी न्याय मिळवण्यासाठी दुर्दैवी मुलीचे पालक आणि प्रसारमाध्यमांची भूमिका महत्वाची ठरते. पालकांनी लाखो रुपयांची उधळण करून लग्न लाऊन दिल्यावरही सासरच्यांकडून वेळोवेळी पैशाची, महागड्या वस्तूंची आणि मालमत्तेची मागणी होत असल्यास मुली कंटाळून असे टोकाचे पाऊल उचलतात. कैक घटनांमध्ये पालक मुलीच्या लग्नासाठी कर्ज काढत असल्याचे समोर येते. काही वेळेस असे कर्ज काही शेतकऱ्यांनी शेतीच्या नावावर घेऊन मुलीच्या लग्नासाठी खर्च केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यातूनच पुढे जाऊन शेतकरी आत्महत्येचे प्रकार घडतात. स्वतःच्या प्रतिष्ठेचा किंवा मुलीच्या सुखाचा प्रश्न म्हणून तिच्या लग्नात केलेला वारेमाप खर्च शेवटी अशा रितीने पाण्यात जावा, हे दुर्दैवी आहे.

सुशिक्षित मुलींनीसुद्धा आपल्या लग्नासाठी, सुखासाठी पालकांना किती किंमत मोजावी लागत आहे, याचे भान ठेवणे गरजेचे आहे. गाड्याघोडी घ्यायची परिस्थिती असतानासुद्धा मुलीच्या माहेरून लांडग्यासारखी ओरबाडून घ्यायची वृत्ती नुकत्याच घडलेल्या घटनेतून समोर आली आहे. उपवर मुली स्वतः या प्रथेला आवर घालू शकतात. हुंडाबळी ही समाजाला, विवाहसंस्थेला लागलेली कीड आहे. या प्रथेमुळे महिलांच्या हक्कांवर अन्याय होतो. आणि त्यांना न्याय मिळण्यात अडचणी येतात. हुंडा प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे, समाजात जनजागृती करणे, हुंडा प्रथेच्या धोक्याबद्दल जनसामान्यांना माहिती देणे, हुंडा देणाऱ्या आणि घेणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे. याद्वारे या प्रथेवर अंकुश आणता येईल. अशा अन्यायाला आणि शोषणाला बळी पडत असणाऱ्या स्त्रियांच्या हक्कांसाठी आवाज उठवणे, त्यांना न्याय मिळवून देणे, शिक्षणाद्वारे महिलांना सक्षम करणे आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनवणे या कार्याद्वारे स्त्रीमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होईल. आधुनिक युगात एकमेकांशी बुद्धी आणि कौशल्याबाबत बरोबरी करण्याचे, त्यांच्याकडे सन्मान म्हणून पाहण्याचे पर्याय उपलब्ध असताना विकतची प्रतिष्ठा, बडेजाव आणि मोठेपणा मिरवण्यापायी पैसा परी पैसा आणि आपल्या काळजाचा तुकडा असलेल्या मुलीला कायमचे हरवून बसणे हे कितपत योग्य आहे, याचा उपवर मुलींच्या पालकांनी जरूर विचार करावा. जिच्या सुखासाठी आपण एवढा आटापिटा करत आहोत, तिचे सुख नक्की कशात आहे, हे पालकांना कळेल तेव्हा या परिस्थितीत बदल घडेल हा विश्वास वाटतो.

# विराट, रोहितची निवृत्ती, पुढे कसोटी!

**दृष्टीक्षेप**
**- शंतनु चिंचाळकर**




विराटच्या निवृत्तीमुळे भारताने एक गुणी, तडाखेबाज, आक्रमक पण वेळप्रसंगी तितक्याच संयमाने निर्णय घेणाऱ्या क्रिकेटपटूला कसोटी क्रिकेटमधून निरोप दिला. रोहितपाठोपाठ त्याने घेतलेला निर्णय धक्कादायक असला तरी रोज नवनवीन उत्तमोत्तम युवा खेळाडू पुढे येत असताना वेळीच निवृत्ती जाहीर करून नव्या रक्ताला वाव देणे विराटने कधीही देशहिताचे मानले असेल. त्याच्या झगमगत्या कारकिर्दीचा वेध.

एकीकडे भारत - पाकिस्तानमध्ये निर्माण होत असलेल्या वाढत्या तणावाचे धक्के सहन करत असतानाच, क्रिकेटच्या विश्वामध्ये हिटमॅन म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या भारताच्या महान फलंदाजाने, रोहित शर्माने २० ओव्हर्सच्या मर्यादित षटकांच्या सामन्यांपाठोपाठ कसोटी क्रिकेटमधूनही निवृत्ती जाहीर करून क्रिकेटरसिकांना धक्का दिला. या घटनेला आठवडाही होत नाही तोवर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस येणारा दुसरा धडाकेबाज फलंदाज, महान खेळाडू विराट कोहली यानेही कसोटी क्रिकेटला जय महाराष्ट्र केला. त्यानेही यापूर्वीच आंतरराष्ट्रीय टी २० संघातून निवृत्ती जाहीर केली आहे. हे दोघेही कसोटी संघातून निवृत्त होणार असले तरी वनडे क्रिकेटमध्ये मात्र खेळणार आहेत.

क्रिकेट हा भारतातील क्रीडारसिकांचा सर्वात आवडता आणि लोकप्रिय खेळ आहे. भारताला कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या कैक महान आणि गुणी खेळाडूंची परंपरा आहे. त्यातील कर्णधार आणि फलंदाज अशा दोन्ही भूमिका पार पाडणाऱ्या अजित वाडेकर, सुनील गावसकर, सौरभ गांगुली आणि अझरुद्दीन यांचा विशेष उल्लेख करता येईल. त्यांच्या वैयक्तिक आणि सांघिक खेळावर आजवर भारताने कैक कसोटीच नव्हे तर मालिका विजयही संपादन केले. पण तो काळ वेगळा होता. क्रिकेट म्हटले की शालेय विद्यार्थी आणि महाविद्यालीयन वयाच्या आसपासचे तरुण त्यात रस बाळगून होते. पण आज दुसरी-तिसरीतल्या शालेय मुलांपासून प्रौढांपर्यंत सर्व स्तरातून क्रिकेटची आवड निर्माण होऊ लागली आहे. म्हणूनच इतर कोणत्याही खेळाडूंच्या कसोटी क्रिकेटमधून घेतलेल्या निवृत्तीची बातमी मनाला क्लेश देऊन गेली नसेल एवढी लागोपाठ येऊन धडकलेल्या रोहित शर्मा आणि नंतर विराट कोहलीच्या निवृत्तीची बातमी चटका देऊन गेली. आज पाच दिवसांचे कसोटी क्रिकेट सामने म्हटले तरी ५० षटकांच्या एकदिवसीय किंवा ट्रेन्टी - ट्वेंटी सामन्यासारख्या धडाकेबाज आणि तितक्याच सातत्यपूर्ण खेळाची अपेक्षा चाहत्यांकडून केली जाते. खरे तर या दोन्ही महान खेळाडूंच्या खेळातील सातत्य, त्यांची शारीरिक तंदुरुस्ती, क्षेत्ररक्षणातील चपळता या गुणांचा विचार केला तर रोहितचे ३८ आणि विराटचे ३६ ही तशी निवृत्ती घ्यायची वये नव्हेत, असे क्रिकेटमधील कोणीही दर्दी जाणकार म्हणेल. देशासाठी सर्वोत्तम कामगिरी पार पाडत आहात, तिथे वय ही गोष्ट दुय्यम राहते. आणखी दोन-तीन वर्षे तरी त्यांनी कसोटी खेळणे चालू ठेवायला हवे होते, असे मत चाहतावर्ग सोशल मीडियावरून मांडत आहे.

रोहितच्या कसोटी क्रिकेटमधील कारकिर्दीचा विचार केला तर २०१३ मध्ये वेस्ट इंडिज क्रिकेट संघाविरुद्ध पहिला कसोटी सामना खेळणाऱ्या रोहितने कसोटी क्रिकेटमध्ये ११६ डावांमध्ये ४०.५७ च्या सरासरीने ४,३०१ धावा केल्या आहेत. दरम्यान, त्याने १२ शतके आणि १८ अर्धशतके झळकावली आहेत. या फॉरमॅटमध्ये त्याचा सर्वोच्च स्कोअर २१२ धावा आहे. तर कर्णधार म्हणून रोहितने २४ कसोटी सामन्यांमध्ये ३०.५८ च्या सरासरीने १,२५४ धावा केल्या आहेत. रोहित शर्मा भारतीय कर्णधार म्हणून शंभरहून अधिक आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ७२.५ टक्के विजयदरासह कर्णधारपदाच्या खुर्चीच्या सर्वोच्च स्थानावर होता.

रोहित आणि विराटच्या या निर्णयांमुळे त्यांच्या चाहत्यांना मात्र मोठा धक्का बसला. प्रत्येक खेळाडूचे आपले असे वैशिष्ट्य असते. त्यामुळे रोहितपेक्षा विशेष करून विराट कोहलीच्या कसोटी क्रिकेटमधील निवृत्तीची बातमी भारतीय क्रिकेटरसिकांना धक्का देऊन गेली. स्लीप आणि कव्हर पॉईंट या आवडत्या क्षेत्ररक्षणाच्या जागांवर त्याने टिपलेले अप्रतिम आणि अशक्यप्राय झेल पाहीले तर तो केवळ एक महान फलंदाजच नव्हे तर चपळ क्षेत्ररक्षकही आहे याबद्दल दुमत असायचे कारण नाही. भारताकडून १८ वर्षाखालील संघाचे केवळ सदस्यत्वच नव्हे तर, कर्णधारपद भूषवणाऱ्या विराटने २० जून २०११ रोजी कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्याने १२३ सामन्यांमध्ये २१० डावांमध्ये ९२३० धावा केल्या आहेत. त्याने ३० शतके आणि ३१ अर्धशतके केली आहेत. तो १४ वेळा नाबाद राहिला असून १०२७ चौकार आणि ३० षटकार मारले आहेत. नाबाद २१४ ही विराटची सर्वोच्च धावसंख्या राहिली असून त्याने सात द्विशतके झळकावली आहेत. आपल्या कारकिर्दीचा शेवट त्याने वैयक्तिक दहा हजार धावा पूर्ण झाल्यावर करायला हवा होता, असे त्याचे चाहते नक्की म्हणत असतील. पण क्रिकेटची पंढरी असलेल्या भारतात रोज नवनवीन तरुण उदयन्मुख खेळाडू पुढे येत असताना वेळीच आपली निवृत्ती जाहीर करून त्यांच्यापैकी एकाला संधी देणे विराटने देशहिताचे मानले असेल.

क्रिकेटच्या मैदानावर खेळत असताना विराटचे आपल्या खेळाद्वारे केवळ वैयक्तिक कामगिरीच नव्हे तर, आपल्या संघातील सहकाऱ्यांची कामगिरीही कशी चमकेल यावर लक्ष केंद्रित केले. फलंदाजाच्या जवळ थांबून, कॉमेंट्स करून आपल्या संघातील गोलंदाजांचे लक्ष विचलित करणाऱ्या ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडसारख्या संघातील क्षेत्ररक्षकांना त्यांच्याच भाषेत उत्तरे देणारा विराट प्रेक्षकांशी अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात हास्यविनोद करताना दिसणारा विराट, एखादा अप्रतिम झेल घेतल्यावर दर्शक स्टॅंडमध्ये बसलेल्या आपल्या पत्नीला किमान टाळ्या वाजव म्हणून खाणाखुणा करणारा विराट (!) आता फक्त एकदिवसीय आणि आयपीएल सामन्यांमधूनच दिसेल.

आणखी काही दिवस कसोटी सामने खेळून विराटला काही विक्रम आपल्या नावावर करण्याची संधी होती. त्याने नेतृत्व केलेल्या कसोटी सामन्यात सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज बनण्याची संधी त्याला होती. सचिन तेंडुलकरने ७२ कसोटी सामन्यांच्या ११३ डावांमध्ये ५९४६ धावा केल्या. विराटने आतापर्यंत ४७४६ धावा केल्या आहेत. सचिनचा विक्रम मोडण्यासाठी त्याला १२०१ धावांची गरज होती. त्याच्या इंग्लंड दौऱ्यावर न जाण्याने त्याचा इंग्लंडविरूद्ध सर्वाधिक धावा काढण्याचा विक्रम होणार नाही. विराट कोहलीने इंग्लंडमध्ये १७ टेस्ट सामन्यांमध्ये ३३ च्या सरासरीने १०९६ धावा केल्या आहेत. इंग्लंडमध्ये भारताकडून सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम त्याच्या नावावर करण्याची संधी होती. सचिन तेंडुलकरने ३० डावांमध्ये ५४ च्या सरासरीने १५७५ धावा केल्या आहेत. सर्वात महत्वाचा विक्रम म्हणजे क्रिकेटमध्ये विराट कोहलीच्या ९२३० धावा असून इंग्लंडविरूद्धची मालिका खेळली असती तर त्याला दहा हजार धावांचा टप्पा पूर्ण करण्याची संधी होती. भारताकडून सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड यांनाच ही कामगिरी करता आली आहे. विराट कोहली या विक्रमापासून दूर राहिला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये भारतासाठी सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम रोहित शर्माच्या नावावर आहे. त्याने ४० सामन्यांमध्ये २७१६ धावा केल्या आहेत. रोहितने टेस्ट क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. विराट कोहली ४६ सामन्यांमध्ये २६१७ धावा करून दुसऱ्या क्रमांकावर आहे. विराट या विक्रमापासूनही दूर राहिला.

भारतीय संघ पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी जून २०२५ मध्ये इंग्लंडचा दौरा करणार आहे. विश्व कसोटी चॅम्पियनशिप २०२७ साठी हा दौरा दोन्ही संघांसाठी अत्यंत महत्त्वाचा असणार आहे. अशा महत्वाच्या दौऱ्यात रोहित, विराटसारख्या गुणी खेळाडूंची उणीव भारतीय संघाला नक्की जाणवेल. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाला यश मिळाले असले तरी, बीसीसीआय त्याच्या वाढत्या वयामुळे नवीन नेतृत्व शोधत होते. त्याच्यानंतर ज्याच्यावर कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली गेली असती तो विराटही आता संघात नसल्याने एका धडाकेबाज पण संयमी सलामीवीर फलंदाजांची उणीव भारतीय संघाला जाणवू शकते. रोहित शर्मानंतर कसोटी संघाचे नेतृत्व जसप्रीत बुमरा किंवा हार्दिक पंड्याकडे जाण्याची शक्यता आहे, पण विराटइतके नेतृत्वगुण आणि तत्पर निर्णयक्षमता या दोघांपैकी कुणाकडेही नाही. म्हणूनच जून २०२५ च्या येत्या इंग्लड दौऱ्याच्या वेळी भारतीय संघाची खरी कसोटी लागणार आहे.

# दुर्मिळ नाणी, नोटा, स्टॅम्प प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

## दुर्मिळ वस्तू पाहण्याचा योग येतो त्या आनंदाला सीमा नसते : तांबटकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शिक्षण घेत असतांना सर्व आपल्या शिक्षकांकडून इतिहासाबद्दल बऱ्याच गोष्टी ऐकत असतात. तसेच त्या काळातील दैनंदिन जीवनात वापरल्या जाणारे नाणी, तसेच सनदी, वस्तू, त्या काळातील बोल्या जाणाऱ्या वेगळ्या भाषा व त्यातील व्यवहार अशा अनेक बाबीबद्दल सर्वांना जाणून घेण्याची उत्सुकता असते. जेव्हा या सर्व दुर्मिळ वस्तू स्वतःच्या डोळ्यांनी बघण्याचा योग येतो तर उत्साहला व आनंदाला सीमा नसते, असे प्रतिपादन रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर यांनी केले.

मखदूम एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटी, रहेमत सुलतान फाउंडेशन, इतिहास प्रेमी मंडळाच्या वतीने अहमदनगर शहराच्या ५३५ व्या स्थापना दिनानिमित्त रहमत सुलतान हॉल सर्जेपुरा मध्ये दुर्मिळ नाणी, नोटा, पोस्टल तिकिट व नवीन चलनातील नाणी व नोटांचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

### प्रदर्शनात विविध नोटा व नाणी

प्रदर्शनात भारतीय संस्थानिक राजांचे स्टॅम्प पेपर, कोर्ट फी स्टॅम्प, स्वतंत्र भारतातील चलनी नाणी, स्मारके, शिक्के, ब्रिटीशकालीन शिके, मुगल राजांची नाणी, काश्मिरी राजांची नाणी, छत्रपती शिवाजी महाराजांची नाणी, अहमदनगर शहराच्या राजांची नाणी, खोटी नाणी, तांत्रिक चुकीची नाणी, ब्रिटीशकालीन नोटा, संस्थानिक राजांच्या नोटा, पोर्तुगीत नोटा, हैद्राबाद निजामाच्या नोटा, खादी हंडी नोटस्, स्वतंत्र भारतातील जुन्या व नवीन चलनातील एक-ते दोन हजारपर्यंतच्या नोटा, बगीनर स्टॅम्प संग्रह, पोस्टल स्टॅम्प संग्रह, सिट लेटरस्, मिनिएचर शिटस् आदी ठेवण्यात आली होती.



प्रमुख पाहुणे म्हणून रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव डॉ. कमर सुरुर, उर्जिता फाऊंडेशनच्या संध्या मेढे, क्वाईन संग्राहक सचिन डागा, गडकिल्ले अभ्यासक ठाकूरदास परदेशी,एमआयएम जिल्हा अध्यक्ष डॉ. परवेज अशरफी, मुस्कान असोसिएशनचे अध्यक्ष सय्यद शफकत,क्वाईन संग्राहक पंकज मेहेर, आर्किटेक्ट फिरोज शेख, जावेद मास्टर, जीवन फाऊंडेशनचे अध्यक्ष आरिफ सय्यद, फिरोज शेख आदी उपस्थित होते.

दोन दिवस चाललेल्या या प्रदर्शनास नगरमधील सर्व इतिहास प्रेमी तसेच शहरातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साह व कुतुहलाने प्रदर्शन पाहून संग्राहक सचिन डागा यांच्यावर या दुर्मिळ वस्तूंबद्दल प्रश्नांची बरसात केली. दोन दिवस मोफत प्रदर्शन लावल्याबद्दल सचिन डागा यांचा मखदुम सोसायटी व रहेमत सुलतान फाउंडेशन च्यावतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबीद दुलेखान यांनी केले. तर आभार शफकत सय्यद यांनी मानले.

# सर्पदंशाने तरुणाचा झोपेत मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : तालुक्यातील धामणगाव पाट येथे सौरभ बादशहा चौधरी या तरुणाचा झोपेत सर्प दंश झाल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. सामाजीक कार्यकर्ते अजित रावसाहेब चौधरी यांचे पुतणे तसेच बादशाह गणपत चौधरी यांचे चिरंजीव होते.

मयत सौरभ बादशहा चौधरी याचे मागे आई-वडील, पत्नी, मुलगा असा परिवार आहे. अत्यंत गरीब कुटुंबातील सौरभच्या आकस्मित निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### ......तर सौरभ वाचला असता

सौरभ हा आपल्या आई-वडील पत्नीसह एका पडक्या घरात राहत होता. अत्यंत गरीब कुटंबातील



या तरुणाने घरकुलासाठी ग्रामपंचायतकडे अनेक वेळा मागणी केली होती. परंतु त्याला वेळेत घरकुल मंजूर झाले नाही. घरकुल न मिळाल्याने त्याला पावसाळ्याची वातावरणात पडक्या घराच्या निवाऱ्यात राहावे लागत होते. पडक्या घरामुळे तो सापाचा बळी ठरला. कुटुंबातील एकुलता एक कर्ता माणूस दगावल्याने कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. या कुटुंबाला नैसर्गिक आपत्तीतून सावरण्यासाठी शासनाने तातडीने मदत करावी, असे सामाजिक कार्यकर्ते अजित चौधरी यांनी सांगितले.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

### शेजाऱ्यांच्या प्रेमात पडू नका : डॉ. विखे

ठरवतो तेच करतो आता शेजाऱ्यांच्या प्रेमात पडू नका, असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. राहाता तालुक्यातील कोऱ्हाळे, डोऱ्हाळे वाळकी येथील निळवंडे कालव्यातून भरलेल्या पाझर तलाव्याच्या जलपूजन प्रसंगी डॉ. विखे पाटील बोलत होते. यावेळी परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी, जलसंपदा विभागाचे अधिकारी, महिला, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, निळवंडे कालव्यांची केवळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस आणि स्व. माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्यामुळेच पूर्ण झाले आहे. कालव्याचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे पाणी आपल्याला उपलब्ध झाले आहे. मंत्री विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १५० फुट चढ असतांना पाणी या गावांना मिळाले. निळवंडेचे पाणी प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचं काम आपण करणार आहोत. ४० वर्ष संघर्ष केला. त्याला आता यश आले आहे. या पाण्याचा उपयोग शेती उत्पादन वाढवण्यासाठी करा. पाण्यावरून कायमच टीका होत गेली, पाणी आल्याने ह्या टीकेला आता पूर्णविराम मिळाला आहे. मंत्री विखे पाटील हे शब्द पूर्ण करणारे नेते आहेत. आम्ही आपल्या सोबत आहोत, असे वातावरण या भागात होत आहे. शिर्डी मतदारसंघ कायमच विखे पाटलांबरोबर राहिलेला आहे. सर्वसामान्य जनतेसाठी काम करत असताना भविष्यामध्ये २५ वर्षाचा विचार करून शिर्डी मतदारसंघाची बांधणी करणार असल्याचे सांगून शिर्डी एमआयडीसी मध्ये टाटा उद्योग समूहाच्या माध्यमातून १६७ कोटीचा प्रकल्प, शासकिय आय. टी. आय, बायपासचे चौपदरीकरण, रोजगार निर्मीती, ऊस शेतीच्या माध्यमातून या भागाला समृद्धी देता येणार आहे. जनतेच्या विकासाठी विखे परीवार कायमच कटीबद्ध असल्याची ग्वाही देत, शिर्डीच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आदर्श शिर्डी करीता गुन्हेगारी मुक्त शिर्डी हा आपला संकल्प आहे तो पूर्णच करणार आहोत.

### चौंडी पर्यटन क्षेत्र होणार : ना. शिंदे

मान्यता दिल्याचे जाहिर केले आहे. यामुळे श्रीक्षेत्र चौंडी एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन आणि तीर्थक्षेत्र म्हणून नावारुपास येईल. श्रीक्षेत्र चौंडीचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता पुरातत्वीय जाण असलेल्या व्यक्ती आणि संस्थांकडूनच विकास आराखड्यातील कामे ३१ मे, २०२८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे अहिल्यानगर येथे उभारण्यात येत असलेले वैद्यकीय महाविद्यालय तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथील सभागृह इमारत उभारणी यास देखील प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. फडणवीस सरकारने घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयांबद्दल सर्व संबंधितांचे श्रीक्षेत्र चौंडीचे भूमिपुत्र आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे मातृकुलाकडून नऊवे वंशज सभापती शिंदे यांनी अभिनंदन करुन आभार मानले आहेत.

### ..अन्यथा ठेकेदार-अधिकाऱ्यांवर कारवाई करणार

असलेले तिर्थक्षेत्र, महाविद्यालय, तसेच मोठ्या प्रमाणात विवाह सोहळे होत असल्यामुळे रहदारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. संबंधित ठेकेदाराने योग्य नियोजन न करता सर्व्हिस रोड पूर्ण करण्यापूर्वीच उड्डाण पुलाचे काम हाती घेतल्यामुळे रहदारीच्या अडचणी अधिक प्रमाणात वाढल्या असून रहदारीस वारंवार अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी वेळोवेळी रहदारी थांबली जावून त्याचा फटका अत्यवस्थ रुग्णाला रुग्णालयात घेवून जाणाऱ्या रुग्णवाहिकांना देखील बसत आहे. त्यामुळे वेळप्रसंगी रुग्णांचा जिव जाण्याचा धोका देखील नाकारता येवू शकत नाही. या सर्व बाबी गंभीर असून अपघाताचे प्रमाण वाढून जीवितहानी देखील होत आहे.

### मराठवाडा दुष्काळमुक्त करणार

त्यातून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन करण्याचे प्रयत्न असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या योजनेचा पहिला टप्पा यशस्वीपणे राबविण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.हिंगोलीच्या शासकिय वैद्यकिय महाविद्यालयात भारतरत्न नानाजी देशमुख यांचे नांव दिले जाईल. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सवा निमित्त देशाचे आठवे ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ येथे विकास कामांसाठी तसेच संत नामदेव महाराज यांचे जन्मस्थळ असलेल्या नर्सी नामदेव येथे विकास कामांसाठी निधी देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हळद प्रक्रिया व संशोधन केंद्राला निधी दिला जाईल. तसेच हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या सोयीसाठी या ठिकाणी हळद शिजविणे व इतर कामांसाठी लागणाऱ्या यंत्र सामुग्रीसाठी निधी देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. राज्यात १०० दिवसांच्या कार्यक्रमात १२५०० शासकिय कार्यालयांमधून विविध उपक्रम राबवून कार्यालय लोकाभिमुख केले आहेत. कार्यालयांमधून सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देत कामालाही गती दिली. त्यानंतर केंद्राच्या क्वालिटी कौन्सीलने केलेल्या तपासणीत ९८ टक्के कार्यालय पास झाल्याचे त्यांनी सांगितले. पुढील काळात १५० दिवसांचा कार्यक्रम हाती घेऊन त्यात ई गव्हर्नन्स्च्या माध्यमातून १२५० सेवा व्हॉट्सअपवर दिल्या जातील. त्यामुळे नागरीकांना प्रमाणपत्रासाठी कार्यालयात चकरा मारण्याची तसेच वजन ठेवावे लागणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील १ कोटी दिदी लखपती करण्याचे उदिष्ट असून आतापर्यंत २५ लाख दिदी लखपती झाल्या आहेत. चालु वर्षात २५ लाख तर पुढील वर्षात ३० लाख दिदी लखपती केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. या शिवाय महिलांची सहकारी संस्था स्थापन करून बहिणींना मिळणाऱ्या पैशातून कर्ज उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करणार आहोत.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

## धनगरवाडीच्या उपसरपंचपदी शिवानी राशीनकर

**जनता आवाज वृत्तसेवा**



**राहाता :** राहाता तालुक्यातील धनगरवाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिवानी गणेश राशिनकर यांची सर्वानुमते निवड झाली आहे.

उपसरपंच साहेबराव आदमने यांनी दिल्याने राजीनामा उपसरपंच पद रिक्त झाले होते. या पदासाठी शिवानी राशिनकर यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी सरपंच गोपीनाथ खरात होते. निवडणूक अधिकारी म्हणन ग्रामसेविका सरला कहार यांनी काम पाहिले निवडीच्यावेळी सदस्य साहेबराव आदमाने, अशोक रक्टे, मीनाताई रक्टे, तसेच तंटामुक्तीचे अध्यक्ष अनिल रक्टे, उपाध्यक्ष रामभाऊ रक्टे, रंगनाथ राशिनकर, राजेंद्र रक्टे, शिवाजी राशिनकर अनिल रक्टे, कारभारी रक्टे, विलास रक्टे, संजय राशिनकर, गणेश राशिनकर व ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मावळते उपसरपंच साहेबराव आदमाने यांनी उपसरपंच शिवानी राशिनकर यांना शभेच्छा दिल्या.

# खर्ड्याची विशेष ग्रामसभा झाली गोंधळात

## अधिकारी गैरहजर तर १७ पैकी तीन सदस्यांची उपस्थिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** तालुक्यातील खर्डा येथे बोलविण्यात आलेल्या ग्रामसभेत प्रश्नांची शरबती झाल्याने चांगलाच गोंधळ उडाला. सभेसाठी प्रत्येक विभागाच्या अधिकाऱ्यांना आमंत्रित केले होते, परंतु एकही जबाबदार अधिकारी या ग्रामसभेत उपस्थित नव्हता. खर्डा ग्रामपंचायतच्या १७ सदस्या पैकी तीन ग्रामपंचायत सदस्य उपस्थित राहिल्यामुळे ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली.

ग्रामस्थ गणेश ढगे यांनी वीज मंडळसहित जलजीवन पाणीपुरवठ्याच्या भोंगळ कारभारावर टीका करताना ग्रामपंचायतच्या कचरा व्यवस्थापन संदर्भात व अनेक



प्रश्नासहित समस्यांना तोंड फोडले. तर सुनील लोंढे यांनी खर्ड्याची ग्रामसभा म्हणजे पोरखेळ असल्याचे सांगत ग्राम सभेला संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे त्यांना नोटीस पाठवून कारवाई करण्याची मागणी केली.

गावातील कामे वाटताना कारागीर लोकांचा विचार केला जात नाही, असे म्हणत संतोष डोके यांनी ग्रामपंचायत सदस्यच उपस्थित राहत नसल्याबद्दल जाहीर नाराजी व्यक्त केली. यावेळी मोठा गोंधळ उडाला होता. परंतु काही नागरिकांनी व पोलिसांनी म ध्यस्थी करून हा प्रश्न येथेच संपवला. काही नागरिकांनी ग्रामरोजगार सेवक बदलण्याची मागणी केली. या ग्रामसभेत ग्रामस्थांनी अनेक प्रश्नांचा ग्रामपंचायत अधिकारी बहिर भाऊसाहेब यांच्यावर भडिमार केला. त्यांनीही कायदेशीर मार्गाने प्रश्न सोडवण्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले. एकंदरीतच पाणी प्रश्न, स्वच्छता, वीज मंडळाचा भोंगळ कारभार इत्यादीसह अनेक प्रश्नांनी खर्डाची विशेष ग्रामसभा मोठ्या गोंधळात संपन्न झाली. परंतु पोलीस बंदोबस्त असल्याने मुद्द्यावरची लढाई गुद्द्यावर गेली नसल्याचे दिसून आले.

### ग्रामसभेस यांची होती उपस्थिती

सरपंच संजीवनी पाटील, ग्रामपंचायत सदस्य मदन पाटील, महालिंग कोरे, सुनील साळुंखे, सुग्रीव भोसले, रतिलाल डोके, गोटू कांबळे,मोहन सकट, परमेश्वर सूळ, बबलू सुरवसे, रोहित भंडारी, धनु साबळे, विकास शिंदे, सचिन सुरवसे, किरण जाधव, राजू सय्यद, आसाराम गोपाळघरे, वीरधवल भोसले, भैय्या मदने, बंटी सकट व आरोग्य कर्मचाऱ्यां सहित खर्डा ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.


# मुसळवाडी परिसरात जोरदार पाऊस

## शेतमालाचे मोठे नुकसान; कांद्याच्या चाळीत गेले पाणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** तालुक्यातील मुसळवाडी परिसरात गेल्या काही दिवसापासून पडणाऱ्या अवकाळी पावसामुळे परिसरातील रस्ते चिखलमय झाले असून शेतकऱ्यांच्या चारा पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे.

मुसळवाडी परिसरात सोमवारी ८२ मि.मी. तर मंगळवारी ७३ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. तसेच महाडूक सेंटर, मालुंजे खुर्द, लाख, जातप, त्रिंबकपूर, करजगाव, बोधेगाव, ब्राह्मणगाव भांड, चांदेगाव, परिसरालाही दमदार पावसाने झोडपून काढले आहे. यंदा अवकाळी पावसाने



मे महिन्यातच हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे शेती पिकांचे नियोजन बिघडून जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या मका व घास या पिकांचे मोठे नुकसान होऊन घासाच्या बियाण्याला मोड फुटले आहेत. तर सोमवार व मंगळवारी झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांनी साठवून ठेवलेल्या कांद्याच्या चाळीत पाणी गेले आहे. अनेक शेतकऱ्यांनी पावसापासून संरक्षणासाठी प्लास्टिक बारदानाखाली शेतातच झाकून ठेवलेले कांदे उघडे होऊन भिजल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

आधीच खराब असलेल्या रस्त्यांची नुकत्याच झालेल्या दमदार पावसामुळे रस्ते फुटून मोठी दुरवस्था झाली आहे. तर वाड्या वस्त्यांवरील रस्ते चिखलमय झाले असून परिसरातील शेतकऱ्यांना आपल्या शेतातून जनावरांचे पशुधन चारा काढण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. वादळी वारे व विजांच्या कडकडाटामुळे परिसरात अनेक ठिकाणी विजेच्या तारा तुटल्या तर काही ठिकाणी खांब पडल्याने विद्युत पुरवठा खंडित होऊन ग्रामस्थांना मोठा त्रास सहन लागला आहे.

# महेश नवमीनिमित्त विविध कार्यक्रम

## विजेत्या स्पर्धकांना मिळणार पन्नास हजारांची रोख बक्षिसे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** अखिल भारतीय स्तरावर माहेश्वरी समाजाचा वंशोत्पत्ती दिन म्हणून महेश नवमी उत्साहात साजरी केली जाते. त्याचाच एक भाग म्हणून संगमनेर तालुका माहेश्वरी सभेच्यावतीने ४ जूनला शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. १ जून ते ९ जून दरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, स्पर्धांसाठी एकूण ५० हजार रुपयांची रोख बक्षिसे ठेवण्यात आल्याची माहिती तालुकाध्यक्ष श्रीनिवास भंडारी व सचिव जुगलकिशोर बाहेती यांनी दिली.

दरवर्षी महेश नवमीनिमित्त भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदा देखील तशाच पद्धतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. स्पोर्ट कार्निवलकरिता मालपाणी उद्योग समूहाचे सहकार्य लाभले आहे. यामध्ये ४ जूनला सायंकाळी ५ वाजता श्री बालाजी मंदिरापासून शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असून, महेश भगवान अभिषेकाचे यजमान पल्लवी व शैलेश कासट आणि शिवानी व कृष्णा आसावा हे आहेत. शोभायात्रेनंतरची अल्पोपहार सेवा श्रीनिवास व राजेंद्र सोमाणी (राजेंद्र उद्योग समूह) यांनी तर रसपान सेवा युवा महेशने स्वीकारली आहे.

कार्यक्रमांसाठी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन तालुका सभेचे उपाध्यक्ष संजय रा. मालपाणी, कोषाध्यक्ष सुजितकुम ार खटोड, संघटन मंत्री सचिन मणियार, सहसचिव जयप्रकाश भुतडा, माहेश्वरी पंच ट्रस्टचे अध्यक्ष गिरीष मालपाणी, सरपंच विश्वनाथ कलंत्री, उत्सव समिती प्रमुख अतुल झंवर, महेश नवमी उत्सवाचे प्रकल्प प्रमुख सुमित अट्टल, वेणूगोपाल कलंत्री, सिद्धांत झंवर आदिंनी केले आहे

## शेतकऱ्याने पिकवला पावणे दोन किलोचा आंबा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** शेतीमध्ये शेतकरी सतत नवनवीन प्रयोग करत असतात. असाच एक हटके प्रयोग धांदरफळ बुद्रुक (ता. संगमनेर) येथील शेतकऱ्याने केला आहे. तब्बल दीड ते पावणे दोन किलो वजनाचे आंबे त्यांनी पिकवले आहे. याची सध्या सर्वत्र चर्चा सुरू झाली असून, अनेक ग्राहक खरेदीसाठी आणि पाहण्यासाठी गर्दी करत आहेत. धांदरफळ येथील शेतकरी काशिनाथ विठ्ठल मेहेत्रे यांनी ही किमया साधली आहे. शेताच्या बांधावर त्यांनी दहा आंब्याची झाडे लावलेली आहेत. यातील एका झाडाला चार-पाच वर्षांपासून फळे येत आहेत. हे झाड आता मोठे झाल्याने फळांचे वजनही वाढले आहे. त्यामुळे यंदा तब्बल दीड ते पावणेदोन किलो वजनाचे आंबे निघत आहेत. प्रथमच एवढ्या मोठ्या वजनाचा आंबा पाहण्यासाठी शेतकरी देखील गर्दी करत आहेत. शेतकरी मेहेत्रे यांनी या आंब्याला काशिनाथ आंबा हे नाव दिले असून त्याची विक्रीही सुरू केली आहे. दीडशेचे आसपास यावर्षी या झाडाला फळे लगडलेली आहेत. तर याची सर्वत्र चर्चा होवू लागल्याने ग्राहकही थेट येऊन खरेदी करत असल्याचे काशिनाथ मेहेत्रे यांनी सांगितले

# पैशाचे पाकीट वाहकाने दिले परत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कोपरगाव बस आगाराची बस ८८४१ ही कोपरगाव-कोळपेवाडी साठी रवाना करण्यात आली होती. या प्रवासा दरम्यान विनोद बनसोडे हे वाहक म्हणून आपली ड्युटी बजावत असतांना त्यांना गाडीमध्ये सापडलेले पैशाचे पाकीट त्यांनी सदर प्रवाशाला परत केले.

कोपरगाव वरून कोळपेवाडी जाऊन सदरची बस कोपरगाव आगारात आली असता त्या बसमध्ये प्रवासा दरम्यान कैलास डोखे (राहणार कोळपेवाडी) यांचे प्रवासा दरम्यान पैशाचे पाकीट बसमध्ये पडले होते. त्या पाकिटामध्ये काही रक्कम तसेच एटीएम कार्ड, आधार कार्ड, पॅनकार्ड



असे होते. सदर प्रवाशाला घरी गेल्यावर सदरची बाब लक्षात आली की, आपल्या खिशातील पैशाचे पाकीट प्रवासा दरम्यान हरवले. त्यांनी त्वरित कोपरगाव बसस्थानकात येऊन चौकशी केली.

दरम्यान वाहक म्हणून विनोद दत्तात्रय बनसोडे हे आपली ड्युटी करत असताना त्यांना ते सापडल्याने गाडीमध्ये सदरचे पाकीट सापडले. त्यांना ते आगाराचे वरिष्ठ अधिकारी नाना आहेर इम्पे, रवी गिरमे यांच्या हस्ते परत केले. उपस्थित प्रवाशांनी देखील वाहकाने दाखवलेल्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांचे कौतुक केले आहे.

## राजेंद्रकुमार पाटील यांच्या कुलसचिवपदी नियुक्तीचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कुलसचिव पदी राजेंद्रकुम ार पाटील यांची नुकतीच नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना अखिल भारतीय क्रांती सेनेचे राज्य संपर्कप्रमुख तथा पुणे विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य मधुकर म्हसे पाटील व सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब पवार यांनी त्यांचे स्वागत केले.राजेंद्रकुमार पाटील यांनी दुसऱ्यांदा महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून पदभार स्वीकारला आहे. याआधी पाटील यांनी कृषी विद्यापीठ प्रशासनात अत्यंत महत्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत.त्यांच्याकडे असलेला प्रशासकीय अनुभव, कार्यतत्परता आणि



नेतृत्वगुणांचा विद्यापीठाच्या प्रगतीस निश्चितच फायदा होणार आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.या स्वागतप्रसंगी अखिल भारतीय क्रांती सेनेच्या वतीने राजेंद्रकुमार पाटील यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आणि विद्यापीठ प्रशासनात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याबाबत अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.

# ज्ञानेश्वर कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे सन २०२५-२६ या गळीत हंगामासाठी बसविण्यात आलेल्या मिल रोलरचे पूजन कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांच्या हस्ते झाले.

सन २०२५-२६ च्या गळीत हंगामात जास्तीत जास्त ऊस गाळपाचे उद्दिष्ट असून त्याच्या पूर्व तयारीच्यादृष्टीने कारखाना मशिनरीचे



ओव्हर ऑइलिंगची कामे जोमाने सुरू आहेत. तसेच ऊस तोडणी वाहतूक मजूर भरतीचे कामही प्रगतिपथावर आहे. त्याचाच एक भाग असलेल्या मिल रोलरचे देखभाल दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्याने तो बसविण्याचे काम सुरू करण्याप्रसंगी रोलरचे पूजन कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी कारखान्याचे संचालक माजी आ. चंद्रशेखर घुले, उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, संचालक ॲड. देसाई देशमुख, काकासाहेब नरवडे, काकासाहेब शिंदे, काशिनाथ नवले, प्रा. नारायण म्हस्के, बबनराव भुसारी, भाऊसाहेब कांगुणे, जनार्धन कदम, शिवाजीराव कोलते, मच्छिंद्र म्हस्के, पंडितराव भोसले, सखाराम लव्हाळे, शंकरराव पावसे, विकास नन्नवरे, अशोकराव मिसाळ, दादासाहेब गंडाळ उपस्थित होते.

## गवांदे क्लासमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल झाला असून विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी उपलब्ध झाली आहे. मात्र त्यांना योग्य मार्गदर्शनाची खरी गरज आहे. आणि ती संधी विद्यार्थ्यांना गवांदे क्लासमध्ये मिळत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये गवांदे क्लासच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थी तयार झाले असून ते आप-आपल्या क्षेत्रामध्ये उंच भरारी घेत आहे. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचे काम गवांदे क्लासच्या माध्यम



ातून प्राप्त झाले आहे असे प्रतिपादन अभिनेता कृष्णा वाळके यांनी यावेळी व्यक्त केले.

गवांदे क्लास मधील १२ वी व मुख्यपरीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संप्पन्न झाला. यावेळी अभिनेता कृष्णा वाळके समवेत गवंदे क्लासचे संचालक प्रा. प्रभाकर गवांदे समवेत गुणवंत विद्यार्थी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रा. प्रभाकर गवांदे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी ११ वी, १२ वी या वर्गामध्ये शिक्षण घेत असताना आपल्या आवडीचे करिअर निवडून ध्येय निश्चित करून जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे. गवांदे क्लासच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले जाते. ११ वी, १२ वी हे वर्ष विद्यार्थ्यांच्या करिअरचा पाया असून त्यांच्याकडून मेहनत करून घेतली जाते.

# भोकरची ग्रामसभा अवघ्या वीस मिनिटांत गुंडाळली

## ऐनवेळचे विषय घेता येत नसल्याचे दाखविले कारण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील भोकरची कोरम अभावी तहकूब केलेली ग्रामसभा दुसऱ्यांदा घेतल्यानंतर तुटपुंज्या उपस्थितीत केवळ अजेंड्यावरील विषयांना मंजी देत गुंडाळली गेली. तहकूब केलेल्या ग्रामसभेत केवळ अजेंड्यावरील विषय असतात, ऐनवेळचे विषय घेता येत नसल्याचा नियम दाखवत ही ग्रामसभा अवघ्या वीस मिनिटांत गुंडळल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

येथीलसरपंचशितलपटारेवग्रामविकास अधिकारी प्रदीप ढुमणे यांच्या सहीने पहिल्या अजेंड्यानुसार दि.२० मे रोजी ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळीही केवळ मोजकेच ग्रामस्थ उपस्थित राहील्याने ही ग्रामसभा तहकूब



करण्यात आली. त्यानंतर पुन्हा दि. २४ मे रोजी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. या ग्रामसभेलाही बोटावर मोजण्याइतकेच ग्रामस्थ उपस्थित होते. अध्यक्षस्थानी सरपंच शितल पटारे होत्या. तर उपसरपंच संदीप गांधले, ग्रामविकास अधिकारी प्रदीप ढुमणे आदी प्रमुख वगळता सोपान बर्डे, बाळासाहेब मते, शरद ढोकणे, रमेश साठे, नंदू माळी, राजेंद्र कांगुणे, गोरक्षनाथ आबुज व पावलस अमोलिक आदी उपस्थित होते. तर इतर ग्रामस्थ दुरून डोंगर साजरे करताना दिसत होते. त्यातील अनेकजण आपल्या कामात व्यस्त दिसले.

यावेळी ग्रामविकास अधिकारी यांनी अजेंड्यावरील विषयांची मांडणी केली. त्यास दुजोरा न मिळताच मंजुरी देण्यात आली. शेवटी काही ग्रामस्थांनी इतर विषय मांडण्याचा प्रयत्न करताच तहकूब केलेल्या ग्रामसभेत इतर म्हणजेच ऐनवेळचे विषय घेता येत नसल्याचा खुलासा पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येताच ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त करत सभास्थान सोडले, एकंदरित या ग्रामसभेत उर्वरीत चौदा ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांसह प्रशासनातील विविध विभागांच्या प्रतिनिधींनीही पाठ फिरविल्याने दोन ते तीन तास चालणारी ग्रामसभा केवळ विस मिनिटांत गुंडाळली गेल्याचे चित्र दिसले. गावच्या इतिहासातील ही पहिली घटना घडल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली.

गेल्या आठवड्यात अचानक आठ सदस्यांसह सरपंच शितल पटारे यांचे फोटोसह भोकरमध्ये भाजपा स्थानेचा बहुमान असलेल्या प्रमुख व मूळ कार्यकर्त्यांचे फोटो नसलेला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा साई संस्थानचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तसेच जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर व तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडेंच्या अभिनंदनाचा फलक झळकला, अन् अनेकांच्या भुवया उंचावल्या असताना गावच्या विकासासाठी सत्ताधाऱ्यांनी घेतलेला हा निर्णय ग्रामस्थांसह गावातील सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांना भावला नसल्याने सर्वांनीच या ग्रामसभेकडे पाठ फिरविली असल्याची चर्चा सध्या गावात दबक्या आवाजात सुरू आहे.

# उपमुख्यमंत्री शिंदेंचे विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य

## जनार्दन गालपगारे; श्रीरामपूर येथील शिवसेना संपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांची बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर मतदार संघातील विकास कामांसाठी निधी व शिवसेना पक्ष संघटना वाढीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सर्वतोपरी सहकार्य राहील, असे प्रतिपादन मुंबई येथील शिवसेनेचे विधानसभा संपर्क प्रमुख जनार्दन गालपगारे यांनी केले.

माजी आ. भाऊसाहेब कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये श्रीरामपूर येथील शिवसेना संपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत गालपगारे बोलत होते. यावेळी त्यांची संपर्क प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल माजी आ. कांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी माजी आ. कांबळे यांनी श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील विकास कामांबरोबरच पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्न केले जातील. त्याचबरोबर सर्वसामान्यांचे तसेच शेतकरी व समाजातील सर्व घटकांच्या अडचणी सोडविण्यासाठी आपण कटीबद्ध असल्याचे सांगितले. शिवसेना नेते ना. शिंदे यांचे श्रीरामपूर तालुक्यातील जनतेवर विशेष प्रेम असून त्यांचेकडून सर्वोतपरी मदत व सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

> शिवसेना नेते ना. एकनाथ शिंदे यांनी यापूर्वीही श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील विकासकामांसाठी भरीव निधी दिलेला असून यापुढील काळातही त्यांचे याकरिता सर्वतोपरी सहकार्य राहील. माजी आ. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघात शिवसेना संघटना बळकट करण्यासाठी आणखी प्रयत्न करावे, असे आवाहन गालपगारे यांनी कार्यकर्त्यांना केले.
>
> **– जनार्दन गालपगारे, शिवसेना नेते**



यावेळी शिवसेना उबाटा गटाचे उपशहर प्रमुख सुनील फुलारे यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.

याप्रसंगी श्रीरामपुर शिवसेना तालुका प्रमुख संतोष डहाळे, माजी नगरसेवक ॲड. संतोष कांबळे, शिवनाथ फोपसे, शिवसेनेचे युवासेना उपतालुकाप्रमुख शुभम ताके, शिवसेना विभाग प्रमुख विजय नांगळ, विभाग प्रमुख महेश मोदी, जेष्ठ शिवसैनिक बाळासाहेब कदम, बाबासाहेब कदम विकासराव थोरात, संजय बाहुले, डॉ. संजय फरगडे, सागर कुदळे, शिवाजीराव सिनारे, ओबीसी तालुका संघटक नितीन मासाळ, भगवान हळनोर, नारायण सोम वंशी, ओम सोमवंशी, विठ्ठल गोराणे, विशाल दुर्गे, सुनील फुलारे, किशोर फाजगे, जगनराव सुपेकर, किशोर बनसोडे, संतोष भालेराव, धीरज हेळकुटे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# डॉ. सुरेश चव्हाणकेंना हिंदू केसरी पुरस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** नगर जिल्ह्याचे भूषण, शिर्डीचे भूमिपुत्र, सुदर्शन न्यूज वृत्तवाहिनीचे प्रमुख डॉ. सुरेश चव्हाणके (हिंदू धर्मयोद्धा) यांना केंद्रीय ग्रामविकास मंत्री गिरीराज सिंग यांच्या हस्ते हिंदू केसरी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### आगेंनी दिल्या डॉ. चव्हाणकेंना शुभेच्छा

पुरस्कार प्राप्तीनंतर संपूर्ण हिंदुस्थानातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. विविध हिंदुत्ववादी संघटनांकडून देखील शुभेच्छा दिल्या जात आहे. शिवप्रहारच्या वतीने शिवप्रहार प्रमुख, माजी पीएसआय सुरज आगे यांनी डॉ. चव्हाणके यांना फोनवर शुभेच्छा दिल्या.



नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे झालेल्या कार्यक्रमात माय होम इंडिया या संस्थेकडून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रखर हिंदुत्ववादी पत्रकारिता तसेच सामाजिक,धार्मिक क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

मध्यमवर्गीय परिवारातून थेट नवी दिल्ली येथे जाऊन राष्ट्रीय पातळीवरचे सुदर्शन न्युज हे हिंदुत्ववादी न्यूज चॅनल स्थापन करून गेल्या २० वर्षांपासून यशस्वीरित्या त्याची धुरा सांभाळणारे डॉ. चव्हाणके देशभर प्रखर हिंदुत्वासाठी ओळखले जातात. देशभरातील हजारो पिडित हिंदुंना त्यांनी सुदर्शन न्युजच्या माध्यमातून न्याय मिळवून दिला आहे.

# प्रा. काळाने यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील परिक्रमा इंजिनिअरिंग कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. रवींद्र काळाने यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडमध्ये शारीरिक शिक्षण या विषयात डॉक्टरेट ही पदवी मिळाली आहे. हि पदवी प्राप्त करण्यासाठीं त्यांना डॉ.नल्ला भास्कर रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले.



या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बबनराव पाचपुते, परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभाताई पाचपुते, सचिव विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह बबनरावजी पाचपुते, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी व मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. अनिल पुंड, अकॅडमी डायरेक्टर इंद्रायणी पाचपुते, अकॅडमीचे डायरेक्टर प्रा. डॉ. संजीव कदम, प्राचार्य मोहन धगाटे, प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ, प्रा. डॉ. सुदर्शन गिरमकर, प्राचार्य डॉ. रमेश शिंदे, प्राचार्य डॉ. पांडुरंग इथापे, प्राचार्य. डॉ. प्रशांत सूर्यवंशी आदींनी अभिनंदन केले.

# बेकायदेशीर रासायनिक खत साठा करणे भोवले

## दोघांवर पोलिसांत गुन्हा दाखल; शिरूर पोलिसांची कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरूर :** शिरूर, पुणे तालुक्यातील न्हावरे गावाच्या हद्दीत अवैधरित्या रासायनिक खते साठवणूक करणाऱ्या दोन आरोपींविरोधात शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई २७ मे २०२५ रोजी सायंकाळी करण्यात आली असून, एकूण ८ लाख ७८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### कोणताही वैध परवाना नाही?

संपूर्ण प्रकरणात आरोपींकडे खत उत्पादन व साठा करण्यासाठी कोणताही वैध परवाना नव्हता. शासनाची फसवणूक करून अवैधरित्या रासायनिक खते साठवणूक करत असल्यामुळे आरोपींविरुद्ध आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणी धनंजय दिनकर पाटील (वय ५३ वर्षे, रा. सण ओर बीट सन सिटी रोड सिंहगड रोड, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून संतोष दिनकर वेताळ आणि महेंद्र गणपत शेलार (दोघेही रा. न्हावरा, ता. शिरूर, जि. पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ मे रोजी सायंकाळी ५.३० वाजता न्हावरा ते गुनाठ रोड शेजारील गट क्रमांक ३१३ मध्ये कारवाई करण्यात आली. या ठिकाणी कोणताही अधिकृत परवाना नसताना अम ोनियम सल्फेट आणि मॅग्नेशियम सल्फेट या रासायनिक खतांचा साठा बेकायदेशीररित्या केला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी धाड टाकली.




या प्रकरणात शिरूर पोलीस स्टेशनमध्ये २८ मे २०२५ रोजी सकाळी ६.१९ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. कारवाईत पोलीस हवालदार शिंदे यांनी सहभाग घेतला असून, प्रभारी अधिकारी म्हणून संदेश केंजळे कार्यरत आहेत शिरूर परिसरात अशा प्रकारे बेकायदेशीर खत साठवणूक करणाऱ्यांविरोधात पोलिसांची ही कारवाई इतरांसाठी इशारा ठरणार आहे.

# आदिराज आरंडेने मिळविले सिल्वर मेडल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** खा.गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल निमगांवखैरी विद्यालयातील खेळाडू आदिराज अनिल आरंडे याने नेपाळ येथे संपन्न झालेल्या कराटे स्पर्धेत सिल्वर मेडल मिळवले.




नुकत्याच २४ व २५ मे २०२५ रोजी नेपाळची राजधानी काठमांडू येथे संपन्न झालेल्या दहाव्या धन बहादुर मेमोरियल आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत आदिराजने सिल्वर मेडल मिळवून शाळेचे, संस्थेचे व गावाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकावले.

### दिग्गज मान्यवरांकडून आदिराजचे कौतुक

आदिराजच्या यशाबद्दल संस्थेच्या चेअरमन पुष्पलता गोविंदराव आदिक, अध्यक्ष प्रा. डॉ. बबनराव आदिक, सचिव व राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश आदिक, माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक, सहसचिव ॲड. जयंत चौधरी, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य नितीन पवार, हंसराज आदिक, सुनील थोरात, मुख्याध्यापक शंकरराव शिंदे, प्रशिक्षक अशोक शिंदे यांनी त्याचे कौतुक केले आहे.

# मौर्य क्रांती संघाकडून राज्यव्यापी अभिवादन सभा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** राजमाता अहिल्यामाई होळकर यांचे या वर्षी त्रिशताब्दी वर्षे संपुर्ण महाराष्ट्रात साजरे होणार आहे. याचाच एक भाग म्हणून मौर्य क्रांती संघाच्या वतीने ३० मे रोजी जामखेड येथे होणार राज्यव्यापी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मौर्य क्रांती संघाचे प्रदेश प्रभारी माय्यप्पा तुराई गडदे यांनी जामखेड येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी वर्ष संपूर्ण राज्यभर साजरे केले जात आहे. याचाच एक भाग म्हणून मौर्य क्रांती संघाच्या वतीने राज्यभर राजमाता अहिल्यामाई होळकर यांचे कार्य आणि इतिहास याची जनजागृती करण्यात येत आहे. राजमाता अहिल्यामाई होळकर यांना विशेष अभिवादन करण्यासाठी चौंडीजवळील जामखेड येथे अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे.




यामध्ये धनगर जमातीचे अत्यंत जल्लोषात पारंपारिक गजी नृत्य राजमाता अहिल्यामाई होळकर यांच्या जीवन संघर्षावर व सत्य इतिहासावर आधारित धनगरी ओव्या व प्रबोधन पर भाषणे होणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रमुख उद्घाटक म्हणून राजमाता अहिल्यामाई होळकर यांचे वडील माणकोजी शिंदे यांचे आठवे वंशज व चोंडी येथील सरपंच अविनाश शिंदे हे उपस्थित असणार आहेत.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून गणेश मैंदाड पाटील, दासराम नायक, डॉ. मगन ससाने, विरय्या यादव, विकास पटेल, आदींची उपस्थिती असणार आहे.

या प्रबोधनपर जयंती अभिवादन सभेस सर्व बहुजन बंधू-भगिनींनी उपस्थित रहावे, असे आवाहन मौर्य क्रांती संघाचे राज्य प्रभारी मायबापा तुराई गडदे यांनी केले आहे.

# पाथर्डीत महाराणा प्रताप जयंती साजरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** भारतीय इतिहासात असे काही थोर योद्धे होऊन गेले, ज्यांनी कधीही परकीय सत्तेसमोर मान झुकवली नाही. त्यामध्ये महाराणा प्रताप यांचे स्थान अग्रक्रमावर आहे असे प्रतिपादन तालुका संघ चालक अरविंद पारगावकर यांनी केले.

पाथर्डी शहरातील कोरडगाव चौकात महाराणा प्रताप यांची जयंती साजरी करण्यात आली.त्यावेळी पारगावकर बोलत होते. यावेळी शंकर महाराज भक्ती मठाचे महंत माधव बाबा, मोहन महाराज सुडके यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष डॉ.मृत्युंजय गर्जे,विश्व हिंदू परिषेचे तालुका अध्यक्ष किशोर परदेशी, नाम देव लबडे,मुकुंद गर्जे,अँड. प्रतीक खेडकर, आजिनाथ डोमकावळे, सचिन नागपुरे, महेश बाहेती, जगदीश लोहिया, अक्षय काळे, हनुमंत परदेशी, प्रदीप तुपे, नीलेश इजारे, अक्षय देवकर, रणवीर परदेशी, तुवरजींत परदेशी,संकेत परदेशी, शुभम परदेशी, महेंद्र परदेशी आदी उपस्थित होते.

# पाण्याच्या डबक्यात पडून दोन बालकांचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील चास शिवारात घराजवळ साचलेल्या पावसाच्या पाण्याच्या डबक्यात पडल्याने दोन बालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

अमितेश बलराज बिडे (वय १०) व अनिकेत बलराज बिडे (वय ०६, दोघे रा. चास, ता. अहिल्यानगर)) असे मयत बालकांची नावे आहेत. ते दोघे सख्खे भाऊ आहेत. याप्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या अमितेश व अनिकेत हे दोघे सख्खे भाऊ त्यांच्या घराजवळ पावसाच्या पाण्यामुळे साचलेल्या डबक्यात पडले. त्याच्या नातेवाईकांना ही घटना कळताच त्यांनी त्या दोघांना बाहेर काढले.

ते बेशुध्द झाल्याने त्यांचे चुलते जयसिंग बिडे यांनी त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतची माहिती जिल्हा रुग्णालय प्रशासनाने पोलिसांना दिली. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

या घटनेची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली आहे.

# संविधानावरील हल्ले वकिलांनी रोखले : ॲड. जायभावे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अत्यंत तल्लख बुद्धिमत्तेच्या जोरावर निर्माण झालेल्या भारतीय राज्यघटनेवर हल्ले करून स्वातंत्र्य, समता, बंधुता व धर्मनिरपेक्षता या मूल्यांना छेद देण्याचे काम जेव्हा जेव्हा राज्यकर्त्यांकडून झाले. तेव्हा हे हल्ले परतवून लावण्याचे व भारतीय संविधान व त्यांची मूल्य अबाधित ठेवण्याचे काम न्यायालय व वकिलांनी केले, असे प्रतिपादन अखिल भारतीय व महाराष्ट्र गोवा वकील संघटनेचे सदस्य अँड. जयंतराव जायभावे यांनी केले.



अकोले राजुर न्यायालयातील न्यायाधीश एस. बी. नवले व न्यायाधीश एस. ए. पर्वतकर, सरकारी वकील अँड नितीन कहाणे यांच्या निरोप व शुभेच्छा समारंभात ते बोलत होते. अकोले तालुका वकील संघाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोले न्यायालयाचे न्यायाधीश श्रीमान अनंत टेंगसे होते.

अकोले न्यायालयातील न्यायाधीश एस. ए. पर्वतकर व राजूर न्यायालयातील न्यायाधीश एस. बी. नवले, सरकारी वकील अँड. नितीन कहाणे यांची अकोले राजूर न्यायालयातून अन्यत्र बदली झाल्यामुळे त्यांना निरोप व सदिच्छा समारंभ अकोले तालुका वकील संघटनेच्या वतीने मातोश्री लॉन्स अकोले येथे आयोजित केला होता.

> भारतीय राज्यघटनेने जनतेला काय दिले व त्याची किंमत किती मोठी आहे. हे विशद करताना न्यायाधीश वकिलांनी भारतीय राज्यघटनेचा अत्यंत सखोल अभ्यास करून संविधान लोकांपर्यंत पोहोचवले पाहिजे व हे संविधान चिरकाल अबाधित राहील, यासाठी जनतेचा आवाज बुलंद केला पाहिजे.
>
> **– अँड. जयंतराव जायभावे**

यावेळी अँड. नेताजी आरोटे, अँड. आर. डी. नवले, अँड. नारायण आरोटे यांनी मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाची सुरुवात माजी प्राचार्य राजू आत्तार यांच्या इतनी शक्ती हमे दे दाता या गीताने सुरुवात केली. आभार प्रदर्शन अँड. बी. एम. नवले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के. बी. हांडे यांनी केले.

# नगर शहराचा स्थापना दिन उत्साहात साजरा

## कविता, शायरी व मुशायराची रंगली जुगलबंदी; शहर स्थापनेपासूनच्या ऐतिहासिक घटनांना उजाळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) शहराचा ५३५ वा स्थापना दिवस बुधवारी (दि. २८ मे) उत्साहात साजरा करण्यात आला. नगरकरांच्या वतीने शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या बागरोजा येथील कबरीवर चादर अर्पण करण्यात आले.

हाजी अजीजभाई चष्मावाला सामाजिक प्रतिष्ठान, मखदूम एज्युकेशन अँण्ड वेल्फेअर सोसायटी, रहेमत सुलतान फाउंडेशन व अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### नगरकारांनी लुटला जुगलबंदीचा आनंद

प्रारंभी कविता, देशभक्तीवरील गीत, शायरी व मुशायराने बागरोजा येथे मैफल रंगली होती. राष्ट्रीय किर्तीच्या शायरा कमर सुरुर यांनी शायरी व मुशायरा सादर केला. एक लम्हा समझकर यू भूल जाना ना मुझे... सदिया जुडी हुई हे मेरे दास्तान से! ही शायरी अहमद बादशाह यांच्यावर सादर करण्यात आली. शायरी, कविता व मुशायराच्या जुगलबंदीचा आनंद उपस्थित नगरकारांनी लुटला.

या अभिवादन कार्यक्रमाप्रसंगी मन्सूरभाई शेख, आबीद दुलेखान, युनुसभाई तांबटकर, अभिजीत वाघ, भूषण देशमुख, उबेद शेख, भैरवनाथ वाकळे, विजयसिंह होलम, डॉ. कमर सुरुर, संध्या मेढे, अन्सार सय्यद, आसिफ शेख, आर्किटेक फिरोज शेख, जुनेद शेख, नवेद शेख, अल्तमश जरीवाला, आसिफ खान, शफाकत सय्यद, सलीम सहारा, नईम सरदार, फिरोज शेख, अल्ताफ शेख, महबूब सय्यद, वाहिद शेख, अबुजर सय्यद, रमिझ शेख, मोसीन शेख, फैय्याज शेख, हमजा शेख आदींसह इतिहास प्रेमी, पत्रकार, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



भूषण देशमुख यांनी शहर स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या ऐतिहासिक घटनांना उजाळा दिला. शहराला लाभलेला ऐतिहासिक वारसा हे नगरकरांचे वैभव असून, अहमद निजाम शहाच्या दूरदृष्टीमुळे आपल्याला हे वैभवशाली शहर लाभल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जगात फार कमी शहरे अशी आहे, ज्यांचा स्थापना दिवस माहिती आहे, त्यापैकी एक अहमदनगर शहर असून, संस्थापक अहमद निजाम शहा यांनी २८ मे १४९० रोजी वसविले. या कार्यक्रमातून शहराच्या वैभवशाली इतिहासाला उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उबेद शेख यांनी केले. आभार भैरवनाथ वाकळे यांनी मानले.

# म्हाळुंगी नदीवरील पुलाचे अपूर्ण काम पूर्ण करा

## आमदार खताळ यांचे पालिका प्रशासन आणि ठेकेदारांना निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर:** संगमनेर शहरातील म्हाळुंगी नदीवर उभारण्यात आलेल्या नवीन पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले असून उर्वरित अपूर्ण कामे १० जूनपर्यंत पूर्ण करण्यात यावे, असे स्पष्ट निर्देश आमदार अमोल खताळ यांनी संगमनेरनगरपरिषद प्रशासनास व संबंधित ठेकेदारास दिले आहेत.



शहरातील स्वामी समर्थ मंदिर ते साई मंदिर या पुलाच्या कामाची काल गुरुवारी सकाळी आ. खताळ यांनी पाहणी केली. त्यावेळी त्यांच्या समवेत मुख्याधिकारी राम दास कोकरे, महायुतीचे नेते श्रीराम गणपुले, ज्ञानेश्वर कर्पे, कैलास वाकचौरे,शिरीष मुळे,कैलास लोणारी, अविनाश थोरात दगाबाई धात्रक, अल्पना तांबे, दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, कैलास कासार, सागर भोईर, प्रशांत वाडेकर, निलेश कोंतम, लखन घोरपडे, विकास डमाळे दिलीप अनाप, राहुल भोईर, शशांक नामन, सौरभ देशमुख, वरद बागुल, आश्विन परदेशी, सनी धारणकर, कृष्णा हासे तसेच साईनगर, घोडेकर मळा पंपिंग स्टेशन परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, म्हाळुंगी नदीवरील पूल कोसळल्यामुळे अनेक वर्षे या परिसरातील नागरिक व विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागला. या गंभीर समस्येची दखल घेत महायुतीच्या कार्यकर्त्यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा यांच्याकडे निधीची मागणी केली. त्यांच्या प्रयत्नातून हे काम मंजूर झाले असून नगरपालिकेच्या माध्य मातून ठेकेदाराने वेळेत काम पूर्ण केले आहे. थोडेफार काम अपूर्ण राहिले आहे आठ ते दहा दिवसांमध्ये पूर्ण करून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा यांच्या हस्ते या नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाचे लोकार्पण करण्यात येईल, असा विश्वास आमदार खताळ यांनी व्यक्त केला. तसेच या कामासाठी नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे आणि ठेकेदारांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

### साईनगर परिसराचा विकास करणार

साईनगर पंपिंग स्टेशन व घोडेकर मळा भागातील महिला आणि नागरिकांनी त्यांच्या अनेक समस्यांचा पाढा आमदार अमोल खताळ यांच्या समोर मांडला. त्यावर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की ''मागील लोकप्रतिनिधींनी या भागाकडे दुर्लक्ष केले. मात्र महायुती सरकारच्या माध्यमातून आता या परिसराचा सर्वांगीण विकास सुनिश्चित केला जाईल, असे सांगितले.

## मोकाट जनावरांच्या मालकांवर कारवाई करणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर नगरपरिषद हद्दीतील जनावरांचे म ालकांनी जनावरे रस्त्यावर मोकाट सोडल्यामुळे ही जनावरे रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी, चौकामध्ये, रस्ता दुभाजकावर मोकाटपणे फिरतात अथवा बसतात त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. काही वेळेस जनावरे रस्त्यावर अचानकपणे आल्यास अपघात होऊ शकतात. शहरामध्ये मोठ्याप्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते तसेच बाहेर गावांहून नागरीक, व्यवसाय व इतर कारणांमुळे शहरात येत असतात. सदर मोकाट जनावरे रस्त्यावर आढळून येत असल्याने त्यांचा परिणाम वाहतुकीवर होत असून तसेच ही मोकाट जनावरे अचानकपणे रस्त्यात आडवे आल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मोकाट जनावरांच्या मालकांनी त्यांची जनावरे स्वतःचे जागेत बंदिस्त करुन ठेवावीत जेणेकरून जनावरे रस्त्यावर येणार नाही. अन्यथा महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम २८५ व २९१ नुसार कोणत्याही सार्वजनिक जागेत अशी जनावरे रस्त्यावर आढळून आल्यास कायद्यातील तरतुदीनुसार दंड अथवा कैद अशा स्वरुपाची शिक्षा होवू शकेल, तरी जनावरे मालकांनी होणाऱ्या कारवाईस बळी पडू नये, असे आवाहन श्रीरामपूर नगरपरिषदेचे प्रशासक किरण सावंत पाटील व मुख्याधिकारी मच्छिंद्र केले आहे.

## घरफोडी करणारा आरोपी जेरबंद



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** घरफोडी करणाऱ्या आरोपीस शहर पोलिसांना जेरबंद करण्यात यश आले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, शहर पोलिस ठाण्यात अनेक घरफोडींच्या तक्रारी दाखल झालेल्या होत्या. या चोरींची पोलिस अधिक्षकांनी गंभीर दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेस जिल्हयातील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत आदेश दिले होते. त्यानुषंगाने पोनि. दिनेश आहेर यांनी पथकास रवाना केले होते.हे पथक वर नमूद घरफोडीच्या गुन्हयाचा गोपनीय माहिती व तांत्रीक विश्लेषणावरून तपास करत असताना यातील एक गुन्हा सनी सोमनाथ राक्षे व त्याचे साथीदारांनी केला असून ते नॉर्दन ब्राँच कॅनॉल जवळ असल्याची माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीवरून पथकाने नमूद ठिकाणी जाऊन पंचासमक्ष एक विधी संघर्षित बालक (रा. कुंभार गल्ली), विकी अरूण डंबाळे (रा. कुंभार गल्ली) या दोघांना ताब्यात घेतले. पथकाने पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातुन ३८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. आरोपीस विश्वासात घेऊन गुन्हयाचे अनुषंगाने विचारपूस केली असता त्याने सनी सोमनाथ राक्षे याने सदरचा गुन्हा केला असून चोरी केलेला काही मुद्देमाल सनी सोमनाथ राक्षे याचेकडे आहे. तसेच उर्वरीत मुद्देमाल हा रोहित उर्फ बाबा शिंदे याच्याकडे विक्रीसाठी दिलेला असल्याची माहिती दिली.

## तीन दिवसानंतर अस्तगावचा वीजपुरवठा सुरळीत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** तालुक्यातील अस्तगाव येथे वीज वितरण कंपनीच्या खांबावर तीन ठिकाणी वीज पडल्याने तब्बल तीन दिवसानंतर वीज पुरवठा सुरळीत झाला. अस्तगाव येथील वीज उपकेंद्रजवळ अमित इंजिनिअरिंगच्या बाजूला तसेच नळे वस्तीजवळ खांबावर वीज पडली. त्यामुळे अस्तगाव भागातील वीज पुरवठा खंडित झाला. वीज पडल्याने बहुतांशी खांबावरील इन्सुलेटेड कप फुटले. त्यामुळे वीज वितरण कंपनीचे कर्मचारी गेल्या दोन दिवसापासून दुरुस्तीचे काम सुरू होते. मात्र तरीही वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना खांबावरील फॉल्ट लवकर निघत नसल्याने गेल्या तीन दिवसापासून अस्तगाव भागातील ग्राहकांची गैरसोय झाली. पुरवठा खंडित असल्याने पिण्याचे पाण्याचा प्रश्न, घरातील फॅन सुरू न झाल्याने उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. तसेच अंधाराचे साम्राज्य पसरले होते. घरातील तसेच दुकानातील इन्व्हर्टर बॅटऱ्या उतरल्याने तेथेही अंधाराचे साम्राज्य होते. वीज नसल्याने विद्युत पंप सुरू होउ न शकल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. दरम्यान वीज पुरवठा गेल्या तीन दिवसापासून थंडीत झाला असल्याने अस्तगाव ग्रामस्थांची मोठी गैरसोय झाली. पुरवठा खंडित असल्याने विजेचे पंप सुरू झाले नाहीत. त्यामुळे पिण्याचे पाण्याचा प्रश्न, घरातील फॅन सुरू न झाल्याने उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. तसेच अंधाराचे साम्राज्य परिसरात पसरले होते.

## पावसामुळे मेंढपाळांचे मोठे हाल

### चिखलामुळे मेंढ्या जागेवर; चारा नसल्याने भुकेने व्याकूळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदे :** तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे मेंढपाळांचे जनजीवन मोठ्या अडचणीत आले आहे. पारंपरिक स्थलांतराच्या मार्गावर ठिकठिकाणी चिखल साचल्याने मेंढपाळांना एका शेतातून दुसऱ्या शेतात मेंढ्या हलवणे अत्यंत कठीण झाले आहे. या परिस्थिती मुळे मेंढपाळांच्या दैनंदिन हालचाली पूर्णपणे ठप्प झाल्या आहेत.



पावसामुळे गवत व चाऱ्याची वाढ खुंटली असून, चाऱ्याची टंचाई तीव्र झाली आहे. मेंढ्यांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यात पावसामुळे मेंढपाळांचे तात्पुरते निवासस्थानही पाण्याखाली गेले. झोपड्यांमध्ये पाणी साचल्याने रात्रीचा थांबाही अस्वस्थ करणारा ठरतो आहे. सततच्या पावसामुळे आरोग्याच्या समस्या उद्भवण्याची शक्यता आहे. या परिस्थितीमुळे श्रीगोंदे तालुक्यातील मेंढपाळ अत्यंत चिंतेत असून, शासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

चाऱ्याची पुरवठा व्यवस्था, सुरक्षित निवारा व आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हे अत्यावश्यक ठरले आहे. प्रशासनाने त्वरित हस्तक्षेप करून या संकटात अडकलेल्या मेंढपाळांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा सर्वत्र व्यक्त होत आहे.

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची दखल घेऊन योग्य त्या मदतीची घोषणा लवकरात लवकर करण्यात यावी, हीच मागणी तालुक्यातील मेंढपाळांनी केली आहे.

## युवा धोरण समितीच्या सदस्यपदी आ. आशुतोष काळे

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोळपेवाडी :** राज्याचे सुधारित युवा धोरण ठरविण्यासाठी क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आलेल्या राज्याच्या युवा धोरण समितीच्या सदस्यपदी आ. आशुतोष काळे यांची निवड करण्यात आली आहे.

महायुती शासनाने बुधवार (दि.२८) रोजी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली युवा धोरण समिती स्थापन केली आहे. यामध्ये उच्च शिक्षित, युवा नेतृत्व व राज्यात आपल्या विकास कामांच्या काम गिरीच्या जोरावर सर्वाधिक मताधिक्यात क्रमांक पाचने निवडून आलेल्या आ. काळे यांना स्थान देण्यात आले आहे. काही महिन्यापूर्वीच आ. काळे यांची महाराष्ट्र विधिमंडळाच्या मराठी भाषा समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा एकदा राज्याच्या अत्यंत महत्वाच्या असलेल्या युवा धोरण समितीच्या सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

आपल्या निवडीबद्दल प्रतिक्रिया देतांना आ. काळे यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्याच्या युवा धोरण समितीवर सदस्य म्हणून निवड झाल्याचा मला अत्यंत आनंद व अभिमान वाटतो. ही निवड म्हणजे केवळ एक पद नाही, तर राज्यातील लाखो तरुणांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करण्याची मोठी जबाबदारी आहे. आजचा युवक हा केवळ देशाचे भविष्य नाहीतर वर्तमानातील शक्ती आहे. युवकांच्या शिक्षण, रोजगार, कौशल्यविकास, मानसिक आरोग्य आणि नेतृत्वगुणांच्या विकासासाठी ठोस पावले उचलणं ही आमची प्राथमिकता राहील.

## आश्वी परिसरात बिबट्यांचा वावर

### शेडगावात दोन बिबट्यांची झाली झुंज



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील पुर्व भागाकडील असणाऱ्या गावांमध्ये बिबट्यांचा मोठा प्रमाणात वावर निर्माण झाल्याने दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेडगावमध्ये तर गावठाण सीमालगत सोनवणे यांच्या वस्ती जवळचं मंगळवारी मध्यरात्री दोन बिबट्याची झुंज झाल्याने वस्तीवर दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून शेडगाव व परिसरात बिबट्यांचा धुमाकुळ सुरू आहे. कुत्रे, शेळ्या यांना बिबट्या शिकार बनवत आहे. चार दिवसांपुर्वी एका शेतकऱ्याच्या बंदिस्त गोठयात उडी घेऊन बिबट्याने बोकडाची शिकार केली होती. मात्र हताश झालेला शेतकरी बंगल्याच्या गॅलरीतून हे दृश्य बघत होता. तर सोमवारी पुर्व भागात वादळासह वीजेच्या कडकड्यात अवकाळी पावसाने मोठे थैमान घातल्याने वीजेचा मोठा लपंडाव सुरू होता. सर्जेराव सोनवणे यांच्या बंगल्या जवळचं रात्री २ वाजेच्या सुमारास डरकाळ्यांचा आवाज आला. सोनवणे यांनी आपल्या नातेईकांना झोपेतून उठवून त्यांना सावध करत बंगल्याच्या टेरेसवर जावून बघितले तर दोन बिबट्यांची झुंज चालू असल्याचे दिसले. यावेळी परिसरातील लोकांनी एकत्र येत फटाके वाजून व विटा फेकून बिबट्याला तेथून पळून लावले. दरम्यान, तूर्त पळालेले हे बिबट्या पुन्हा नक्की येणार असल्याने सोनवणे वस्तीवर दहशतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे वन विभागाने येथे त्वरीत पिंजरा लावावा, अशी मागणी होत आहे.

दोन बिबट्यांमध्ये झुंज होणे ही एक एक सामान्य घटना असून आपल्या हद्दीसाठी किंवा शिकारीसाठी काही वेळा, बिबट्या एकमेकांना मारतात, तर काहीवेळा ते गंभीर जखमी होतात. मात्र या घटनेतून शेतकरी भयभीत झाला आहे. वनविभागाने त्वरीत पिंजरा लावून या बिबट्यांचा बदोबस्त करावा.

**-रुपाली सोनवणे,**
**तालुकाध्यक्ष, रिपाई महिला आघाडी**

## अन्यथा राष्ट्रवादी कॉँग्रेस स्वबळावर लढणार

### संगमनेरात बैठक: स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** आम्ही महायुतीचे घटक पक्षांतील प्रमुख पक्ष आहोत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जागा वाटपासंदर्भात योग्य चर्चा होऊन निर्णय झाला पाहिजे, अन्यथा आपण स्वबळावर लढावे, अशी कार्यकर्त्यांची इच्छा असल्याचे पक्षाचे जिल्हाध्यक्ष कपील पवार यांनी सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या संदर्भात राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या कार्यालयात बैठक पार पडली. पक्षाचे जिल्हाध्यक्ष कपील पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला शहर आणि तालुक्यातील पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. महिला जिल्हा अध्यक्ष वैशाली राऊत, शहराध्यक्ष प्रवीण कानवडे, युवक जिल्हाध्यक्ष कपील पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

तालुकाध्यक्ष अक्षय भालेराव यांसह अशोक काळे, भाऊ म्हस्के, मनीष माळवे, गजानन भोसले, प्रसाद काठे, नितीन अहिरे, अमृता कोळपकर, गौरव वाळे, प्रतीक गाडेकर, भाऊराव देशमुख, नामदेव कातकडे, छबूराव सानप, रावसाहेब दिघे आदी उपस्थित होते. राष्ट्रवादी कॉँग्रेसला संगमनेर तालुक्यात जनाधार आहे. त्यामुळे महायुती म्हणून निवडणुकीत जागा वाटपात योग्य झाला पाहिजे. तसेच सभासद नोंदणी आढावा. यावरही बैठकीत चर्चा झाली. जिल्हाध्यक्ष कपील पवार म्हणाले, स्थानिक निवडणुका पक्ष वाढीसाठी व कार्यकर्त्यांच्या निवडणुका असतात. त्यामुळे वरिष्ठ काय तो निर्णय घेतील. परंतु, आपण सज्ज पाहिजे, या दृष्टीने बैठक होती. उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार पक्ष विस्ताराचे काम सुरू आहे.

## आरोग्य तपासणी शिबीराचा ३५० जणांनी घेतला लाभ

### मोफत शारीरिक तपासणी व पाणी परीक्षण शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील बेलापूरमध्ये एकदिवसीय मोफत शारीरिक तपासणी शिबीरात गावाच्या परिसरातील ३५० जणांनी लाभ घेतला.

या शिबीर दरम्यान सर्व ग्रामस्थांचे आणि प्रमुख पाहुण्यांचे स्वागत प्रदीप साळुंके यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रास्ताविकाद्वारे प्रतिष्ठानमार्फत अजिंक्य साळुंके करण्यात आली. त्यांनी सदरील उपक्रमाचे महत्त्व, उद्दिष्टे आणि सामाजिक बांधिलकी स्पष्ट केली. तसेच प्रतिष्ठानमार्फत आजपर्यंत झालेल्या सर्व सामाजिक आणि तत्सम उपक्रमाबद्दल देखील माहिती त्यांनी ग्रामस्थांना करुन दिली. त्यानंतर प्रताप साळुंके यांनी अध्यक्षीय सुचना मांडत रणजित श्रीगोड यांना कार्यक्रमचे अध्यक्षस्थान भूषवावे तसेच अनुमोदन श्री गणेश साळुंके दिले. कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्वलन करून गंगाधरशास्त्री यांच्या प्रतिमेची पूजन करून शारदास्तवन गायन देखील झाले.



### पाणी सुरक्षततेबाबत जनजागृती

आयोजकांनी हा उपक्रम केवळ तपासणीपुरता सीमित न ठेवता समाजातील आरोग्य जागृती आणि पाणी सुरक्षिततेबाबत जनजागृती वाढवण्याच्या दृष्टीने म हत्त्वपूर्ण ठरेल, असे सांगितले. हा उपक्रम समाजाच्या आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल असून, भविष्यात अधिकाधिक नागरिक याचा लाभ घेतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड मयूर साळुंके यानी केले. तर आभार प्रदर्शन भरत साळुंके यांनी केले.

बेलापूरचे प्रथम न्यायाधीश शैलेश सातभाई यांचा यावेळी सपत्नीक सत्कार विजय साळुंके यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी पुण्याहून आलेले पामोसा फाऊंडेशनचे सुप्रसिद्ध डॉ. पाठक आणि त्यांची संपूर्ण टीम चा देखील सत्कार करण्यात आला. सदरच्या कार्यक्रमादरम्यान सुनील मुथा, अशोकनाना साळुंके, भागवत साळुंके, उपसरपंच प्रियांकाताई कुऱ्हे, जेष्ठ पत्रकार विष्णुपंत डावरे, अरुण पाटील नाईक, शरद नवले, अभिषेक खंडागळे, अशोक प्रधान, राजेंद्र कर्पे, प्रभात कुऱ्हे हे देखील उपस्थित होते.

हा उपक्रम गंगाधरशास्त्री बद्रिनारायणशेठ साळुंके सामाजिक प्रतिष्ठानतर्फे राबवण्यात आला असून, विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत आरोग्यसेवा पुरवण्याचा प्रयत्न करण्यात आला. शिबिरात ३५० हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. ज्यामध्ये वृद्ध, महिला व लहान मुले यांची संख्या लक्षणीय होती. प्रत्येक नागरिकाची सविस्तर आरोग्य तपासणी, रक्तदाब, हृदयस्पंदन, रक्तशर्करा, ऑक्सिजन स्तर, तसेच पाण्याच्या गुणवत्तेची कसून चाचणी करण्यात आली. पाण्याच्या नमुन्यांवर रासायनिक विश्लेषण करून पातळी, क्षारता, हानिकारक धातूंची उपस्थिती तपासण्यात आली, ज्यामुळे सुरक्षित पाणी उपलब्धतेसंबंधी सुयोग्य उपाययोजना सुचवण्यात आल्या. तज्ज्ञ डॉक्टर, नर्सेस आणि जलतज्ज्ञांच्या उपस्थितीत नागरिकांना त्वरित सल्ला आणि वैद्यकीय मदत मिळाली.

## कासारे येथे कृषी साहित्यांचे वाटप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा स्मार्ट इरिगेशन प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील कदम यांच्या देखरेखीखाली नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद व कृषि अभियांत्रिकी विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथे कार्यरत असलेल्या कन्सोरशिया रिसर्च प्रोजेक्ट, आयओटी सक्षम व सेंसर आधारीत अद्ययावत सिंचन व्यवस्थापन प्रणाली प्रकल्पांतर्गत कृषि साहित्यवाटप कार्यक्रमाचे आयोजन मौजे कासारे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथे करण्यात आले होते.

याप्रसंगी स्मार्ट इरिगेशन प्रकल्पाचे सहप्रमुख संशोधक डॉ. प्रमोद पोपळे, कासारे गावचे सरपंच श्री. शिवाजी निमसे, संशोधन सहयोगी डॉ. शुभांगी घाडगे, वरिष्ठ संशोधन सहकारी इंजि. शुभम सुपेकर आणि इंजि. गणेश उपस्थित होते. यावेळी स्मार्ट इरिगेशन प्रकल्पांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेच्या माध्यमातून कासारे गावातील १९ शेतकऱ्यांना कृषि साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये कृषि अवजारे, जैविक खते, जैविक औषधे व कृषिदर्शनी-२०२५ या साहित्याचा समावेश होता. याप्रसंगी डॉ. प्रमोद पोपळे यांनी प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती देऊन शेतीसाठी उपयुक्त आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. यावेळी त्यांनी भूगर्भातील पाणीसाठा वाढवण्यासाठी फायदेशीर ठरणाऱ्या विविध पद्धतींची आणि मृदा व जलसंधारण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्वागत श्री. शिवाजी निमसे यांनी केले.

# समीरची यशोगाथा

संघ लोक सेवा आयोगाच्या परीक्षा देण्यासाठी परिक्षार्थी आयुष्यातली तीन□चार वर्ष खर्ची घालतात. त्यामुळे स्पर्धा परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यापेक्षा जास्त अभिमानास्पद बाब असूच शकत नाही. दरवर्षी एमपीएससी/युपीएससी स्पर्धांचे निकाल जाहीर झाल्यानंतर सर्वोच्च गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढे येतात. अलिकडेच युपीएससी परीक्षेचे निकाल जाहीर झाले. त्यात नागपूरचे समीर प्रकाश खोडेंनी महाराष्ट्र राज्यामध्ये प्रथम तर देशामध्ये ४२ वा नंबर पटकावला. मेहनतीने यश साध्य करणारे खोडे सध्या रायपूर येथील भारतीय रेल्वे सेवेमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मधून केमिकल इंजिनिअरिंगमध्ये पदवी आणि आयआयएम लखनौमधून एम.बी.ए. केले. रेल्वे मंत्रालयामध्ये रुजू होण्यापूर्वी केडरमधील आय.आर.टी.एस. या कंपनीमध्ये त्यांनी सुमारे सात वर्षे काम केले. रेल्वे मंत्रालयासाठी काम करत असतानाच आयएएस अधिकारी होण्याची इच्छा मनात बाळगून नागरी सेवा परीक्षांची तयारी सुरू केली.

'युपीएससी'मध्ये यश मिळालेल्या धाकट्या भावाच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. त्यांच्या या प्रवासामध्ये भावाचे आणि मित्र आय.ए.एस. शुभम भाईसारे यांचेही मार्गदर्शन लाभले. कोणत्याही परीक्षेची तयारी करत असताना त्या विषयाचा पाया पक्का

**अचिव्हर**

असण्याची आवश्यकता असते. त्यामुळे त्यांनी या परीक्षेसाठी संबंधित विषयांचे जुने पेपरसेट अभ्यासले तसेच वर्तमानपत्राचे रोज वाचन करणे फायदेशीर ठरले. खेरीज संबंधित पुस्तकांचा योग्य वापर करून ज्ञानात भर घातली. परीक्षेसाठी आवश्यक विषयाचे ज्ञान आणि जागरुकता या छोट्या पण महत्त्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष न करता त्यांनी आपला अभ्यास सुरू ठेवला.

कोणतेही यश आपल्याला एका प्रयत्नामध्ये मिळाले तर त्यांची किंमत राहत नाही, ही बाब खरी असली तरी आलेले अपयश स्वीकारून पुढे जाण्याची तयारी ठेवावीच लागते. पहिल्या प्रयत्नामध्ये झालेल्या चुका सुधारून पुढे गेल्यामुळे खोडे यांना ही यशाची पायरी गाठता आली. आजची पिढी करिअरबाबत जागरुक तर आहेच खेरीज अपयशाने लगेच खचून जाणारी सुद्धा आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करत असतानाच तुमच्या पाठीशी एखादा बॅकअप असायला हवा. म्हणजे अपयश आले तरीसुद्धा तुमचा आत्मविश्वास टिकून राहील आणि पुढील आयुष्याला धीराने सामोरे जाऊ शकाल, असे त्यांचे सांगणे आहे.






## शेर की जुबानी

आने से पहले तेरी सजाते
कहां से फूल
मौसम बहार का तो तेरे
साथ आया है।

माना गलती हुई है हमसे
पर ऐसे खामोश ना हो जाइये।
जो दोगे सजा कुबुल होगी हमें।
बस एक बार मुस्कुरा जाइये।

ख्वाब तुटे है मगर हौसले जिंदा है
हम वो है जहां मुश्कीलें शरमिंदा है।

**हाऊ टू!**

## पेटीएमवरून काढा अनावश्यक माहिती!

पेटीएम अकाउंटवरून तुम्ही अनावश्यक माहिती डिलीट करू शकता. त्यासाठी पेटीएम ॲप उघडा आणि प्रोफाइलवर जा. 'केवायसी' सेक्शनमध्ये जाऊन 'रिमूव्ह केवायसी' बटणावर क्लिक करा. खात्रीसाठी तुमचा पेटीएम पासवर्ड टाका. यात तुमचे केवायसी डिटेल्स डिलीट होऊ शकतात. ट्रान्झॅक्शन हिस्ट्री डिलीट करण्यासाठी 'पासबुक' वर जाऊन तुम्हाला नको असणारे ट्रान्झॅक्शन निवडा. 'ॲड' बटणावर क्लिक करा आणि 'रिमूव्ह ट्रान्झॅक्शन' निवडा. ॲड्रेस काढण्यासाठी प्रोफाइलवरील ॲड्रेस सेक्शनला जाऊन 'ॲड्रेस रिमूव्ह' बटण दाबा. मोबाईल नंबर रिमूव्ह करण्यासाठी 'सेफ्टी सेटिंग्ज' सेक्शनमध्ये जा. 'चेंज मोबाईल नंबर' ऑप्शनवर क्लिक करा. फील्डमध्ये तुमचा नवीन मोबाईल नंबर टाका. जुन्या मोबाईल नंबरवरून मिळालेला ओटीपी टाका. 'कन्फर्म' बटणावर क्लिक करा.

**ॲप वर्ल्ड**

## एआय कॅमेरा असणारा पहिला फोन



मोटोरोला कंपनीचा बहुप्रतीक्षित मोटो एज ५० प्रो ५ जी स्मार्टफोन अखेर लाँच झाला आहे. या फोनमध्ये ४५०० एएमएच क्षमतेची बॅटरी देण्यात आली आहे. यात १२५ वॅट वायर्ड आणि ५० वॅट वायरलेस फास्ट चार्जिंग सपोर्ट मिळतो. या फोनमध्ये जगातील पहिला एआय □पॉवर्ड प्रोग्रॅम कॅमेरा आहे. दोन व्हेरिएंटमध्ये हा फोन खरेदी करता येईल. ८ जीबी रॅम, २५६ जीबी स्टोरेज व्हेरिएंटची किंमत २९,९९९ रुपये आहे. १२ जीबी रॅम, २५६ जीबी स्टोरेज व्हेरिएंट ३३,९९९ रुपयांना खरेदी करता येईल. स्पीड आणि मल्टीटास्किंग करताना हा फोन अजिबात हँग होणार नाही. या फोनमध्ये ५० मेगापिक्सल प्रायमरी कॅमेरा, १३ मेगापिक्सल मायक्रो अल्ट्रा वाईट कॅमेरा देण्यात आला आहे.

**सोशल मीडिया**

## कमी किंमतीतला दमदार प्लान!




जिओने ९९९ रुपयांचा जिओ भारत व्ही २ फोन लॉन्च केला. आता कंपनीने या फोनसाठी प्रिपेड प्लॅन आणला आहे. याअंतर्गत ग्राहकांना २८ जीबी डेटा आणि अनलिमिडेट कॉलिंग देण्यात येत आहे. २३४ रुपये प्लॅनमध्ये २८ जीबी डेटा, अनलिमिटेड वॉइस कॉल आणि २८ दिवसांसाठी ३०० एसएमएस मिळणार आहेत. हा प्लान ५६ दिवसांसाठी वैध असून 'जिओ सावन', 'जिओ सिनेमा'चे फ्री सब्सक्रिप्शन देणार आहेत.

**स्मार्ट ट्रिक्स**

## क्लिक फोटोज विथ डिफरंट मोड्स

सध्या दमदार कॅमेरावाले स्मार्टफोन बाजारात दाखल होत आहेत. मात्र कॅमेरा कितीही दमदार असला तरी फोटो तुम्हालाच काढायचा असतो. मोबाईल कॅमेऱ्यामध्ये बरेच मोड्स असतात. शिवाय तुम्ही मॅन्युअल सेंटिंग करूनही उत्तम फोटोग्राफी करू शकता. चालती गाडी, बस किंवा खेळाडूंचा फोटा घ्यायचा असेल तर कॅमेऱ्याचा बर्स्ट मोड ऑन करा. फोनमध्ये एचडीआर ऑटो मोड असतो. या मोडमुळे तुम्हाला वेगळ्या पद्धतीने फोटो काढायची संधी मिळते. या मोडमुळे कॅमेरा विविध रंग अगदी सहज टिपतो. यासोबतच एक्सपोजर, ऑप्टिकल झूम, लाईव्ह फोकस अशा मोड्सचा वापर करू शकता.





## पोषक आहार हवा

उकाड्याचा सामना करायचा तर रोगप्रतिकारशक्ती उत्तम हवी. यासाठी नियमित व्यायाम तर हवाच शिवाय पोषक आहारही घ्यायला हवा. पोषक आहार घेतल्यास आपण कोणत्याही परिस्थितीवर मात करू शकू. म्हणूनच उष्णतेचा प्रकोप असणाऱ्या या काळात कोणत्या घटकांचा आहारात समावेश करायला हवा? जाणून घेऊ.

✻ शरीरात जीवनसत्त्वं, खनिजं तसंच इतर पोषक घटकांची कमतरता भरून काढण्यासाठी आहारात विविधरंगी फळं आणि भाज्यांचा समावेश करा.

✻ सध्याच्या काळात ताणतणावही वाढला आहे. हा ताण कमी करणं आवश्यक आहे. तणाव कमी करण्यासाठी डार्क चॉकलेटचं सेवन करण्याचा सल्ला दिला जात आहे. डार्क चॉकलेटमधला कोकोआ नावाचा घटक तणाव कमी करायला मदत करतो.

**फिटनेस फंडा**

✻ हळद घातलेलं दूध प्यायल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. त्यामुळे सकाळी किंवा संध्याकाळी हळदीचं दूध प्या.

✻ शरीराला चांगल्या फॅट्सची आवश्यकता असते. यासाठी आक्रोड, बदामाचं सेवन करता येईल. आहारात ऑलिव्ह तसंच मोहरीच्या तेलाचा समावेश करता येईल.



✻ दररोज योगा, श्वसनाचे व्यायाम आणि धावणं, चालण्यासारखे व्यायाम करून तुम्ही तंदुरूस्त राहू शकता. मुख्य म्हणजे जंक फूड टाळा आणि आरोग्यदायी पदार्थांचं सेवन करून रोगप्रतिकारक शक्ती वाढवा.

## पायलट व्हायचे आहे?

काहींची स्वप्नं लहानपणापासूनच ठरलेली असतात. काहीतरी वेगळं करण्याची काहींना आवड असते. त्यापैकी एक म्हणजे पायलट होण्याचं अनेकांचं स्वप्न असतं. तुम्हालाही १२ वी नंतरच पायलट बनायचे असेल तर पायलट ट्रेनिंग प्रोग्राम जॉईन करु शकता. त्यासाठी तुम्हाला काय करावे लागेल? जाणून घेऊ या.

✻ पायलट होण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही १२ वी शास्त्र शाखेतून पूर्ण केलेलं असावं. पण काही पायलट ट्रेनिंग संस्था वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनाही प्रवेश देतात. त्यासाठी विद्यार्थ्यांचे वय कमीत कमी १७ वर्ष असले पाहिजे. पायलट बनण्यासाठी फिटनेस आणि मेडिकल प्रमाणपत्रही द्यावे लागते.

✻ एयरलाइन्स ट्रान्सपोर्ट पायलट, प्रायव्हेट पायलट, स्पोर्ट्स पायलट, फ्लाइट इन्स्ट्रक्टर आणि एयरफोर्स पायलट हे पायलटचे पाच प्रकार असतात. प्रत्येक प्रकाराच्या अभ्यासासाठी वेगवेगळ्या प्रशिक्षण



संस्था असतात.

✻ १२ वी नंतर पायलट होण्यासाठी कमर्शियल पायलट ट्रेनिंग प्रोग्राममध्ये प्रवेश घ्यावा लागतो. यासाठी

**करिअर**

एक प्रवेश परीक्षा आणि मुलाखतही होते. मुलाखतीमध्ये उत्तीर्ण झाल्यावर मेडीकल टेस्ट द्यावी लागते. या अभ्यासक्रमासाठी साधारणत: १५ ते २० लाख रुपये खर्च होतात.

✻ भारतीय वायुदलातून पायलट बनण्यासाठी एन.डी.ए. परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागते आणि हा तीन वर्षांचा कोर्स पूर्ण झाल्यावर फ्लाइंग ट्रेनिंगमध्ये भाग घ्यावा लागतो.

## पुन्हा पारख गरजेची

माझं नुकतंच लग्न ठरलं आहे. होणाऱ्या नवऱ्याला तीन वेळा भेटल्यानंतर मी होकार दिला. त्या भेटींदरम्यान त्याची वागणूक खूप चांगली असायची. आमच्यात चांगला संवाद झाला. मात्र साखरपुड्यानंतर त्याचं वागणं अचानक बदललं. तो मला टाळू लागला. याबाबत मी माझ्या वडिलांशी चर्चा केली. त्यानंतर त्यांनी त्याची भेटही घेतली. त्यावेळी सर्व काही ठीक असल्याचं त्याने स्पष्ट



केलं. पण त्याच्या वागण्यात काहीच बदल झाला नाही. याबाबत विचारलं असता मी जाड आणि उतावळी असल्यामुळे असं वागत असल्याचं तो म्हणाला. लग्नाबाबत तो खूपच गोंधळल्याचं दिसतंय. तो डॉक्टर आहे. आमच्या पत्रिकाही जुळल्या आहेत. मात्र या परिस्थितीत मी काय करायला हवं?

**मॅच मेकिंग**

**उत्तर :** शरीराच्या ठेवणीवरून तुझा अनादर करायचा अधिकार कोणालाही नाही. तो तुझा आदरच करत नसेल तर त्याच्यासोबत आयुष्य घालवायचं की नाही याचा पुन्हा विचार कर. होणाऱ्या नवऱ्याशी बोल. त्याच्या वागणुकीचा तुला त्रास होत असल्याचं स्पष्टपणे सांग. शारीरिक बदल कायमस्वरूपी नसतात. वजन कमी होऊ शकतं. पण या कारणामुळे तो तुझ्याशी वाईट वागू शकत नाही. नातं टिकून रहाण्यासाठी दोघांचाही एकमेकांना खंबीर पाठिंबा असायला हवा. नातं फुलायला हवं. पण याचीच कमतरता असेल तर अशा नात्यांना काहीच अर्थ उरत नाही. तू त्याच्याशी चर्चा कर. त्याला काय खटकतं हे जाणून घे. एखाद्यावेळी तू पटकन रिॲक्ट झाली असशील. प्रतिक्रिया आणि प्रतिसाद या दोन्ही वेगळ्या गोष्टी आहेत. तू तुझ्या स्वभावाचा आढावा घे. तू पटकन व्यक्त होतेस का, याचा विचार कर. स्वभावातले दोष दूर करण्याचा प्रयत्न कर. आयुष्यातल्या प्रत्येक टप्प्यावर तुला याचे लाभ होतील.

## लज्जत आलू फ्रँकीची

दोस्तांनो,उरलेल्या पोळीचं काय करायचं असा प्रश्न पडला असेल तर झटपट होणारी आलू फ्रँकी ट्राय करता येईल. सकाळचा नाश्ता किंवा इव्हिनिंग स्नॅक म्हणूनही तुम्ही ही रेसिपी बनवू शकता. हॉस्टेल स्टुडंट्सना हा पदार्थ नक्कीच आवडेल.



**सामग्री:** पोळ्या, चमचाभर तेल किंवा बटर, आलं□लसूण पेस्ट एक चमचा, तीन उकडलेले बटाटे, अर्धा चमचा लाल तिखट, एक छोटा चमचा गरम मसाला, अर्धा चमचा चाट मसाला, चिरलेली कोथिंबिर,चिरलेला कांदा, चवीनुसार मीठ

**झटपट रेसिपी**

**कृती:** बटाटे सोलून कुस्करून घ्या. कढईत तेल किंवा बटर गरम करा. त्यात आलं□लसूण पेस्ट घालून थोडी परता. त्यात बटाटे, तिखट, गरम मसाला, चाट मसाला, कोथिंबीर आणि मीठ घाला. सर्व घटक एकजीव करा. मिनिटभर परता. हे सारण बाजूला ठेवा. आता गॅसवर तवा ठेवा. त्यावर थोडं बटर घाला. पोळ्या थोड्या भाजून घ्या. त्यावर चिरलेला कांदा, बटाट्याचं सारण, थोडा चाट मसाला घाला. हे मिश्रण पोळीवर नीट पसरवा. आता पोळीचा घट्ट रोल करा. वरच्या कडा दुमडून घ्या. टिश्यू पेपर किंवा ॲल्युमिनियम फॉईलमध्ये गुंडाळून सॉससोबत खा. याच पद्धतीने चीज, पनीर फ्रँकी करता येईल.

## आकर्षक व्यक्तिमत्त्वासाठी...

व्यक्तिमत्व आपल्याला इतरांपेक्षा वेगळे बनवते. ओळख करून देताना तुम्ही साधारणपणे नाव आणि तुमच्याबद्दल आवश्यक असलेली एखादी गोष्ट सांगता. पण, महत्त्वाचं म्हणजे व्यक्त होण्याआधीचं तुम्ही देहबोलीद्वारे स्वत:बद्दलची खूप माहिती देत असता. घर, परिसर, शाळा, कॉलेज किंवा कामाच्या ठिकाणी तुमचं व्यक्तिमत्त्व हेच महत्त्वपूर्ण ओळख बनतं. म्हणूनच यशाच्या जवळ जाण्यासाठी उत्तम व्यक्तिमत्व असणं गरजेचं आहे. ते घडवायचे कसे? पाहू या.

* ज्ञान वाढवा : ज्ञान वाढेल तितकं तुमचं व्यक्तिमत्त्व सुधारेल. जास्त ज्ञान असणाऱ्यांकडे लोक लवकर आकर्षित होतात. यासाठी प्रत्येक नवीन विषय सखोलपणे जाणून घेण्याचा प्रयत्न करा आणि त्याचा नीट अभ्यास करा. ज्ञान वाढल्याने व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल होतात.

* सकारात्मक विचार : चांगले व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी सकारात्मक मानसिकता ठेवणं अत्यंत गरजेचं आहे. सकारात्मक राहिला तर आजूबाजूच्या लोकांनाही सकारात्मक ऊर्जा जाणवेल आणि ते तुमच्याकडे आकर्षित होतील.

**ग्रुमिंग**

* त्रुटी सुधारा : व्यक्तिमत्व सकारात्मक ठेवण्यासाठी कमकुवतपणावर काम करणं महत्त्वाचं आहे. म्हणून, स्वत:मधील कमतरता समजून घ्या आणि त्या स्वीकारा. शक्य तितक्या लवकर त्यावर मात करुन दूर करण्याचा प्रयत्न करा.

* अडचणींना धैर्याने सामोरे जा : स्वतःला कम्फर्ट झोनमधून बाहेर काढा. मनात भीती निर्माण करणाऱ्या प्रत्येक कठीण प्रसंगाचा सामना करा. यामुळे आत्मविश्वास वाढेल आणि तुमचं व्यक्तिमत्वही सुधारण्यास मदत होईल. आयुष्यात अडचणी येतच राहतात. पण त्यांना पूर्ण आत्मविश्वासानं सामोरं जा. अडचणींकडे नकारात्मक दृष्टिकोनातून नव्हे तर सकारात्मक दृष्टिकोनातून पाहा.



## अतिसुंदर स्पिती व्हॅली

हिमाचल प्रदेश हे भारतातलं एक सुंदर राज्य. हिमालयाच्या कुशीत वसलेलं हिमाचल पर्यटनाचं प्रमुख केंद्र आहे. इथल्या अनेक व्हॅलीज लक्ष वेधून घेतात. इथे येऊन तुम्ही काही निवांत क्षण घालवू शकता. हिमाचलमधली स्पिती व्हॅली खूप प्रसिद्ध आहे. सध्या अनेक जण निसर्गाच्या सानिध्यात राहून काम करत आहेत. तुम्हालाही ताजंतवानं होण्यासाठी फिरायला जायचं असेल तर स्पिती व्हॅलीचा पर्याय निवडायला हरकत नाही.

**भटकंती**

स्पिती व्हॅलीमध्ये ट्रेकर्सची चांदी असते. इथल्या निसर्गात निवांत ट्रेकिंग करता येतं. स्पिती व्हॅली जवळचं धनकर सरोवर खूप सुंदर आहे. या सरोवरांपर्यंतचा ट्रेक आहे. धनकर सरोवराकडे जाताना कजा आणि तबो ही शहरं लागतात. धनकर नावाच्या गावातून साधारण तासभर ट्रेकिंग केल्यावर धनकर सरोवर येतं. हे सरोवर समुद्रसपाटीपासून १४ हजार किलोमीटर उंचीवर आहे.

या सरोवराचं पाणी पिता येतं. मात्र पाण्याची बाटली सोबत नेणं योग्य ठरतं. इथे येणाऱ्या पर्यटकांची गाडी धनकर मॉनेस्ट्री लगत पार्क केली जाते आणि मग ट्रेकिंगला सुरूवात होते.

धनकर ट्रेकला जाताना केळी, सुकामेवा असे पदार्थ सोबत न्या. यामुळे तुम्हाला आवश्यक ती ऊर्जा मिळू शकेल. ट्रेकिंगची आवड असेल तर स्पिती व्हॅलीला नक्की जा. इथला निसर्ग तुम्हाला खुणावेल. शिवाय ताजंतवानंही करेल.

